# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५५९ — विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०९/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.)प्रभाग समिती सी, येथील विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती सी, फुलपाडा व सहकार नगर येथे मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे.सदर फुलपाडा व सहकारनगर परिसरातील साई यश संकुल व बारोंडादेवी बिल्डिंग परिसरातील इमारती हया रस्त्यांच्या पातळीपेक्षा खाली आहेत. त्यामुळे सदर परिसरातील इमारतीच्या जुन्या गटारातुन पाण्याचा निचरा होण्यास अडथळा होत असल्याने सदर परिसरातील गटार भरुन वाहत असते. त्यामुळे तेथील रहिवाश्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो.

उपरोक्त गटारबाबत तेथील नागरीक वारंवार लेखी/तोंडी तक्रार महानगरपालिकेत करत आहेत. त्या अनुषगांने पुढील नमुद गटारांचे काम करणेचे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंतभूर्त बाब | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वविशम क्षेत्रातील प्रभाग समिती सी, मधील वॉर्ड क्र.२४ मधील साई यश संकुल ते मथुरा डेरी गटाराचे बांधकाम करणे. | लांबी - ७५ मी<br>पाईप - ४५० मीमी & NP३ | ४१९२७५/- |
| २ | वविशम क्षेत्रातील प्रभाग समिती सी, मधील वॉर्ड क्र.२२ मधील बारोंडादेवी इमारत ते प्रथमेश नगर मुख्य रस्त्यापर्यंत पाईप गटाराचे बांधकाम करणे. | लांबी - ६० मी<br>पाईप - ३०० मीमी & NP२ | २१२३९३/- |

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार (पू)फुलपाडा येथे उपरोक्त नमूद कामांची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमूद विविध कामांसाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास तसेच दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरीता मान्यताप्राप्त दरपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चासमा.आयुक्त सा़ो. हयांचे कडील दि. १८/०९/२०२० रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/६५२/२० आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

01.03.2021

उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

P/5

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५५२ — विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ०९/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) प्रभाग समिती 'सी'मधील वॉर्ड क्र.२२ व २४ येथील विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती 'सी' फुलपाडा येथे मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. सदर फुलपाडा परिसरात रामचंद्र नगर येथील रस्त्यांची मोठया प्रमाणावर दुरावस्था झालेली आहे. सदर रस्ता दुचाकी वाहनांच्या रहदारीस धोकादायक झाला असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब उपरोक्त रस्ते तातडीने डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पुढील नमुद रस्त्यांची सुधारणा करणेची मागणी वांरवार तेथिल रहिवाशी यांच्याकडून करणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंतभूर्त बाब | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) प्रभाग समिती सी,प्र.क्र.२२ मध्ये रामचंद्र नगर गेट नं.१ फुलपाडा येथे रस्त्याची सुधारणा करणे. | १. Dismantling Flexible Pavements = ४३m x९m<br>२. DBM (Dense Bituminous Macadam)= ४३m x९m<br>३. BC (Bituminous concrete) =४३m x ९m | ४,९४,७६६/- |
| २ | वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) प्रभाग समिती सी,प्र.क्र.२४ मध्ये रामचंद्र नगर गेट नं.२ फुलपाडा येथे रस्त्याची सुधारणा करणे. | १. Dismantling Flexible Pavements = ४६mx८.५०m<br>२. DBM (Dense Bituminous Macadam)= ४६mx८.५०m<br>३. BC (Bituminous concrete) =४६mx८.५०m | ४,९९,८८०/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) प्रभाग समिती सी,प्र.क्र.२५ मध्ये फुलपाडा येथील आर.जे.एन्.एक्स जवळील रस्त्याची सुधारणा करणे. | १. Dismantling Flexible Pavements = ३०mx७.८०m<br>२. DBM (Dense Bituminous Macadam) = ३०m x७.८०m<br>३. BC(Bituminous concrete) =३०m x७.८०m | २,९९,३६१/- |

**ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार (पू)फुलपाडा येथे उपरोक्त नमूद कामांची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमूद विविध कामांसाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास तसेच दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरीता मान्यताप्राप्त दरपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चासमा.आयुक्त सो. हयांचे कडील दि. १८/०९/२०२० रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/६५२/२० आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Khandare 01-03-2021

उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ५५३ **विभाग :-** वाहन
**दिनांक :-** ०९/०३/२०२१

**विषय :- बेवारस वाहन जप्ती प्रकरणी वाहन मालकाकडून करावयाची दंडाची रक्कम निश्चित करणे बाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-**

१. मा. उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र. ९२/२०१७ टेकचंद खाणचंदाणी विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी अनधिकृतपणे सोडून दिलेली वाहने (बेवारस वाहने) याबाबत नागरीकांना तक्रारी नोंदविण्यासाठी तक्रार निवारण यंत्रणा गठीत करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने नगर विकास विभागाने शासन परिपत्रक क्रमांक : न्यायाप्र -२०१८/प्र.क्र.६७९/नवि-२०, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ अन्वये महानगरपालिकांना खालीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत.

अ) महानगरपालिकांच्या मालमत्तेवरील, रस्त्यावरील बेकायदेशीरपणे सोडून दिलेली वाहने/बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याकरिता स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन व स्थानिक पोलीस प्रशासनाशी विचार विनिमय करुन कालबध्द कार्यवाहीकरिता धोरण निश्चित करुन कार्यवाही करावी.

आ) रस्त्यावरील बेकायदेशीरपणे सोडून दिलेली वाहने/बेवारस वाहनांबाबत तक्रार नोंदविण्यासाठी महानगरपालिकांनी टोल फ्री दुरध्वनी क्रमांक उपलब्ध करावेत. तसेच What's App लघुसंदेश, ई-मेल तक्रारी नोंदविण्यासाठी सुविधा उपलब्ध करावी.

इ) सदर तक्रारीसाठी स्वतंत्र तक्रार वही निश्चित करुन नागरिकांना त्यानुसार तक्रार क्रमांक उपलब्ध करुन द्यावा.

ई) प्राप्त तक्रारी बाबत स्थानिक पोलीस प्रशासनास अवगत करावे व महानगरपालिकांनी निश्चित केलेल्या धोरणानुसार कालबध्द स्वरुपात कार्यवाही करावी.

उ) निनावी तक्रारींचीही दखल घ्यावी.

ऊ) तक्रार निवारण यंत्रणेस कार्यालयीन सुचना फलक, वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे, समाज माध्यमे ( Social Media) इत्यादींद्वारे वेळोवेळी प्रसिध्दी द्यावी.

ऋ) प्राप्त तक्रारींबाबत आवश्यक कार्यवाही त्वरेने करावी आणि याबाबतचा नियतकालीक आढावा उप-आयुक्त दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यांमार्फत घेण्यात यावा.

२. उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात बेवारस वाहनांवर कारवाई करणेसाठी सहा. आयुक्त यांना निर्देश देण्यात आले असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे तसेच तक्रार निवारण व्यवस्था बाबत कार्यवाही करणेत येत आहे.

३. शहरात ठिकठिकाणी महापालिकेच्या रस्त्यावर दुचाकी/चारचाकी वाहने बेवारस अवस्थेत उभी करण्यात येतात. सदरची वाहने संबधित वाहन मालकांकडून हटविण्यात न आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. तसेच साफसफाईच्या कामातदेखील अडचण येते. त्यामुळे उपरोक्त नमूद शासन परिपत्रकाप्रमाणे बेवारस अवस्थेत असलेली वाहने नियमाप्रमाणे कारवाईअंती जप्त करुन चारचाकी वाहन मालकाकडून दंडापोटी रु. ५०००/- व दुचाकी वाहन मालकाकडून रु. ३०००/- एवढी रक्कम आकारणी करणेसाठी देखील प्रस्तावित करण्यात येत आहे.

४. तरी वरीलप्रमाणे शुल्क आकारणी करणेस व इतर तक्रार निवारण यंत्रणासंदर्भात कार्यवाहीसाठी मान्यता मिळणेकामी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>ठराव निर्णय :-</u>

**प्रस्तावात नमूद शासन परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शहरात ठिकठिकाणी बेवारस अवस्थेत असलेली वाहने नियमांकित कार्यवाही करून जप्त केलेल्या चारचाकी वाहन मालकाकडून रु. ५०००/-, तीन चाकी वाहन मालकाकडून रु. ४०००/- दुचाकी वाहन मालकाकडून रु. ३०००/- एवढी रक्कम दंडापोटी आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे. चार चाकापेक्षा अधिक चाक असलेल्या कोणत्याही वाहनासाठी रु. १०,०००/- इतकी दंडापोटी आकारणी करावी.**

**या ठरावातील निर्णय अंतिम असून त्याची थेट अंमलबजावणी करण्यात यावी.**

1/3/2024

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ५५४

विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०९/०३/२०२१

प्रस्तवाचा विषय - प्रभाग समिती (ई) हद्दीतील वाघोली साईनाथ पाडा येथे पाणीपुरवठा करिता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत २" एच. डी. पी. ई. पाईप ५५५ मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे

प्रस्तवाचा मजकूर - वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील नालासोपारा विभागीय कार्यालयाच्या वाघोली उप-विभागांतर्गत भूतपूर्व वाघोली ग्रामपंचायत कालावधीत वाघेश्वरी मंदिराजवळील विहिरीतून असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेतून परिसरात आदिवासी पाड्यांना पाणीपुरवठा करण्यात येतो. भूतपूर्व वाघोली ग्रामपंचायत कालावधीत पिण्याचे पाण्याची दुसरी कोणतीही सुविधा नसल्याने सार्वजनिक स्टॅण्डपोस्ट देवून वाघोली वाघेश्वरी मंदिर रोड, साईनाथ पाड्यावरील आदिवासी लोकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर आदिवासी पाड्यावर पाणीपुरवठा करणारी जलवाहीनी १ १/२" व २ एच.डी.पी. पी.व्ही.सी. प्रकारची आहे. साईनाथ आदिवासीपाडा वितरण जलवाहीनीच्या शेवटच्या भागात असल्याने व अंतर लांबचे असल्याने पाणीपुरवठा कमी प्रमाणात होतो. जलवाहीनी अंथरल्याला बराच कालावधी झाल्याने जलवाहीनी काही ठिकाणी दाबल्या गेल्याची शक्यता असल्याने परिसरातील आदिवासी लोकांना पिण्याच्या पाण्याची अडचण जाणवत आहे. पाणीपुरवठा सुरळीत करण्याकरिता वाघेश्वरी मंदिर ते साईनाथ पाडा पर्यंत अस्तीत्वात असलेल्या वितरण जलवाहिनीचे दोन झोन मध्ये पाणीपुरवठा वितरण करावा लागणार आहे. याकरीता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत नविन २" व्यासाची एच. डी. पी. ई. पाईप अंथरुन अंतर्गत जोडणी केल्यास साईनाथ पाडा वरील पाणीपुरवठा सुरळीत होऊ शकतो. याकरिता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत २" एच. डी. पी. ई. पाईप,५५५ मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे आवश्यक आहे. याकामी निविदा मागवून काम करावे लागणार आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती (ई) हद्दीतील वाघोली साईनाथ पाडा येथे पाणीपुरवठा करिता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत २" एच. डी. पी. ई. पाईप ५५५ मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे | रू.२,६१,२६१/- |

सोबत प्रभाग समिती (ई) हद्दीतील वाघोली साईनाथ पाडा येथे पाणीपुरवठा करिता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत २" एच. डी. पी. ई. पाईप ५५५ मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे कामी होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सोबत जोडले आहे. व त्यासाठी रक्कम रू.२,६१,२६१/- इतका खर्च अपेक्षित आहे.

ठराव - सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (ई) हद्दीतील वाघोली साईनाथ पाडा येथे पाणीपुरवठा करिता वाघोली स्मशान भुमी ते साईनाथ पाडा मेन रोड पर्यंत २" एच. डी. पी. ई. पाईप ५५५ मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे करीता महानगरपालिका अधिनियमाचे कमल ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(Khandare 22/2/21)

उप-आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ५५५

विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०३/०२/२०२३

**प्रस्तवाचा विषय -** प्रभाग समिती (ई) हद्दीतील निर्मळ, भंडार आळी मेन रोड व साईनगर येथे पाणीपुरवठा करिता असलेल्या १" / १½ पी.व्ही.सी लाईन ऐवजी २" एच. डी. पी. ई. पाईप ४६० मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे.

**प्रस्तवाचा मजकूर -** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती (ई) च्या हद्दीतील निर्मळ उप विभाग तात्कालीन ग्रामपंचायत निर्मळ तर्फे बोअरवेल वरुन पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करण्यात आली होती. बोअरवेल वरुन पंपिंगद्वारे लगतचे टाक्या भरुन निर्मळ कार्यालया जवळील परिसर येथील स्थानिक रहिवाश्यांना पाणी पुरवठा करण्यात येतो. बोअरवेल वरुन पाणीपुरवठा करणारी १" / १½ पी.व्ही.सी लाईन अंथरल्याल्या बराच कालावधी झ ाल्याने ठिकठिकाणी लिकेज होत असते त्या मुळे स्थानीक लोकांना पाणीपुरवठा अडचण येत आहे. पाईपलाईन लिकेज कारणाने स्थानीक रहिवाशी प्रभाग कार्यालयात व लोकप्रतिनिधींकडे वारंवार तक्रार करीता आहेत. याकरीता निर्मळ, भंडार आळी मेन रोड व साईनगर ठिकाणी नव्याने २" एच.डी.पी. पाईप जलवाहीनी स्पेशल साहित्यसह पुरविणे, अंथरणे, व इतर किरकोळ कामे करणे काम करावे लागणार आहे. जेणेकरुन योजनेवरुन होणारा पाणीपुरवठा सुरळीत राहण्यास मदत होईल. याकामी निविदा मागवून काम करावे लागणार आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | प्रभाग समिती (ई) हद्दीतील निर्मळ, भंडार आळी मेन रोड व साईनगर येथे पाणीपुरवठा करिता असलेल्या १" / १½ पी.व्ही.सी लाईन ऐवजी २" एच. डी. पी. ई. पाईप ४६० मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे | रू.२,४७,१०४/- |

सोबत प्रभाग समिती (ई) हद्दीतील निर्मळ, भंडार आळी मेन रोड व साईनगर येथे पाणीपुरवठा करिता असलेल्या १" / १½ पी.व्ही.सी लाईन ऐवजी २" एच. डी. पी. ई. पाईप ४६० मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणे कामी होणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक सोबत जोडले आहे. व त्यासाठी रक्कम रू. २,४७,१०४/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**ठराव -** सबब उपरोक्त नमुद प्रभाग समिती (ई) हद्दीतील निर्मळ, भंडार आळी मेन रोड व साईनगर येथे पाणीपुरवठा करिता असलेल्या १" / ११/२ पी.व्ही.सी लाईन ऐवजी २" एच. डी. पी. ई. पाईप ४६० मीटर लांब स्पेशल साहित्यासह पुरविणे, अंथरणे व किरकोळ कामे करणेकरीता महानगरपालिका अधिनियमाचे कमल ४९ व ६८(१), ६९(१) व (२) आयुक्तांच्या आदेशान्वये मला प्रधान केलेल्या अधिकारानुसार सदर कामांना प्रशासकिय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Rhandare
2/2/23

उप-आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५५६ | विभाग : बांधकाम
दिनांक : ०२/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय:-** प्रभाग समिती एच वॉर्ड नं. ९५ मध्ये चुळणे येथील नाल्याच्या बाजुला संरक्षक भिंत बांधणेचे काम रद्द करणेस मंजुरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (एच) वॉर्ड नं. ९५ मध्ये चुळणे येथील नाल्याच्या बाजुला संरक्षक भिंत बांधणेचे काम पुर्ण करणे कामी दि. १६/११/२०१९ रोजी जाहीर निविदा सुचाना प्रसिध्द झाली होती. मुदतीत असलेल्या निविदा पैकी मे. संजय कंन्स्ट्रक्शन यांची १६.२९% कमी दराची निविदा मंजूर केलेली होती सदर कामी मे. संजय कंन्स्ट्रक्शन याची रक्कम रु. ७.४५.०००/- अतिरिक्त सुरक्षा अनामतची रक्कम भरलेली आहे. परंतु १ वर्षाचा कालावधी निघून गेल्यावरही मे. संजय कंन्स्ट्रक्शन ह्यांना कामाचा कार्यादेश देण्यात आलेला नाही. मे. संजय कंन्स्ट्रक्शन ह्यांनी दिनांक १८/०१/२०२१ रोजी अर्ज करुन सदर भरलेली अतिरिक्त रक्कम ची मागणी केलेली आहे.

**प्रस्तावाचा निर्णय :-** सदर नाल्याचे बाजूला संरक्षक भिंतीचे काम करणे साठी जागेची अडचण निर्माण होत असल्यामुळे सदर ठिकाणी काम करणे शक्य होणार नसल्यामुळे काम रद्द करणे आवश्यक आहे. तरि सदरचे काम रद्द करुन ठेकेदार मे. संजय कंन्स्ट्रक्शन ह्यांनी भरलेली इसारा रक्कम व अतिरिक्त रक्कम (परफार्मन्स अनामत) परत करणेस हरकत नाही.

०२/०३/२०२१

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

**प्रशासकीय ठराव क्र.** ५५८ | **विभाग : वैद्यकीय आरोग्य**
**दिनांक :** 02/03/**2021**

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत कार्यरत शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.फेज-२ प्रकल्पाअंतर्गत कार्यरत २३ कर्मचाऱ्यांना पुर्ननियुक्ती देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- शासनाचा प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम(आर.सी.एच फेज-२) हा प्रकल्प वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राबविणेकरीता दिनांक २२/०९/२००९ रोजीच्या पत्रान्वये कृती आराखडा तयार करण्यास मंजूरी देण्यात आली होती. याकरीता महानगरपालिकेने प्रशासकीय ठराव क्र.४०६ दिनांक ०७/०४/२०१० नुसार सदर कामी मान्यता देण्यांत आलेली असुन यासाठी एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी स्थापना करण्यास मंजूरी देण्यांत आलेनुसार मनपाच्या महानगरपालिकेच्या वसई विरार सिटी म्युनिसिपल कॉर्पोरेशन्स् इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटीची स्थापना दिनांक २३/०६/२०१० रोजी करण्यात आली. महानगरपालिका क्षेत्रामध्ये आर.सी.एच फेज-२ हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाव्दारे विविध ठिकाणी ९ नागरी आरोग्य केंद्र मंजूर करण्यात आली.

यानुसार सद्यस्थितीत आर.सी.एच.फेज-२ प्रकल्पांतर्गत वरील प्रमाणे २३ कर्मचारी कार्यरत असुन सदरचा कर्मचारी वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी व विस्तारित भागामध्ये आरोग्य सुविधा पोहचविणे,माता व बाल मृत्यूचे प्रमाण करणे व सदर योजनेतंर्गत कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण कार्यक्रम, नियमित लसीकरण,गरोदर मातांचा नियमित तपासणी, राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम, जंतुनाशक व जिवनसत्व अ मोहिम, कुटूंब पाहणी सर्व्हे, जननी सुरक्षा योजना, रक्त नमुने,साथीबाबतचे मार्गदर्शन शालेय अरोग्य तपासणी, प्रसूतीपूर्व नोंदणी, किशोरवयीन मुलींची आरोग्यतपासणी व समुपदेशन, अंगणवाडीमधील बालकांची तपासणी व बालरोग व स्त्रीरोग तज्ञांचे मासिक तपासणी शिबीरे इ. विविध उपक्रम राबविले जात आहेत.

सबब सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरीता "रुग्णालय वैद्यकिय अधिकारी/वैद्यकिय सेवा व्यस्थापन ठेका " या लेखाशिर्षाखाली रु.२,९०,००,०००/- इतकी तरतुद केलेली असुन यामधुन वसई विरार सिटी म्युनिसिपल इंटिग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटीस या प्रकल्पांतर्गत कार्यरत उपरोक्त सर्व २३ कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी सन २०२१-२२ करीता रु.७०,०१,८८१/- इतका खर्च वेतनावर होणे अपेक्षित आहे.

सदयस्थितीत यानुसार सोबत तक्ता क्र.१ ते २३ मध्ये नमूद केलेले २३ कर्मचारी हे प्रजनन व बाल आरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.फेज-२ उपक्रमांतर्गत कार्यरत असल्याने संबधित सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन एप्रिल २०१४ पासून महानगरपालिकेकडून अदा करणेत येत आहे. सर्व कर्मचाऱ्यांना या योजनेप्रमाणेच सदयस्थितीत ११ महिन्याच्या करारतत्वाप्रमाणे १ दिवसांची सेवा खंडित करुन पुनश्च ११ महिन्याची करारतत्वावरील अस्थायी स्वरुपात सेवा सुरु ठेवण्यास व १०० टक्के अनुदान महानगरपालिकेकडून मिळणे बाबत दिनांक .१९-०५-२०१४ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.५ सभा सुचना क्र.१ नुसार सदर कामी मंजूरी देण्यात आली आहे व त्याप्रमाणे आजतागायत हया कर्मचाऱ्यांना १ दिवसांची सेवा खंडित करुन पुनश्च ११ महिन्याची करारतत्वावर पुर्ननियुक्ती देण्यांत आलेली आहे.

सदरील कर्मचाऱ्यांची ११ महिन्याची सेवा करार १५ मार्च २०२१ मध्ये संपुष्टात येत असुन सर्व कर्मचाऱ्यांचे खालील तक्त्यात दर्शविलेल्या दिनांकास सेवा समाप्त करणे आवश्यक असून सर्व कर्मचाऱ्यांचे गोपनिय अहवाल सन २०२०-२१ चे सादर केलेले आहेत त्यानुसार १ दिवसांची सेवा खंडित करुन पुनश्च ११ महिन्याची करारतत्वावरील अस्थायी स्वरुपात पुर्ननियुक्ती देणे आवश्यक आहे.

| अ. क्र | कर्मचाऱ्याचे नाव | पद | हजर दिनांक | ११ महिन्याचे करार समाप्ती दिनांक | सेवा समाप्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगीता गोकूल बेलदार | जी.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| २ | किर्ती जितेंद्र वर्तक | जी.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ३ | रुचिता राजेंद्र पाटील | जी.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ४ | सविता नितीन तांबे | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ५ | रोशना गितेश म्हात्रे | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ६ | जान्हवी ना. शेडामे | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ७ | अक्षता बबन पाटील | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ८ | शिल्पा वसंत पाटील | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ९ | हेमाली बाबू खेडेकर | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १० | दिपाली अनंत वैद्य | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| ११ | चित्रा गुरुनाथ परब | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १२ | रेखा शिवनारायन झा | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १३ | सुषमा हरेश पालकर | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १४ | सुप्रिया अमेय हतीपकर | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १५ | हेमलता संदिप साळोखे | ए.एन.एम | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १६ | निरंजन अशोक पाटील | अकाऊटंट | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १७ | परिणिता अजय कोरे | डे.ए.ऑ | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १८ | प्रेमांजली किरण अंभिरे | कनिष्ट लिपीक तथा संगणक चालक | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| १९ | जोत्स्ना हरिश्चंद्र पाटील | कनिष्ट लिपीक तथा संगणक चालक | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| २० | विलास दा. पाटील | कनिष्ट लिपीक तथा संगणक चालक | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| २१ | दर्शना मंगेश पाटील | कनिष्ट लिपीक तथा संगणक चालक | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| २२ | अजय गजानन घोडविंदे | शिपाई | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |
| २३ | मल्लिकार्जून गुरुपादया हिरेमठ | शिपाई | १६/०४/२०२० | १५/०३/२०२१ | १५/०३/२०२१ |

तरी उपरोक्त कर्मचाऱ्यांचे अकरा महिन्याचा सेवा करार दिनांक १५/०३/२०२१ रोजी मध्यानोत्तर संपुष्टात येत असुन १ दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्याच्या करारतत्वाप्रमाणे सेवा सुरु ठेवणेस व पुर्ननियुक्ती करणेबाबत निर्णय होणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस्तव सादर.

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिके अंतर्गत कार्यरत शासनाच्या प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रम आर.सी.एच.फेज-२ प्रकल्पाअंतर्गत कार्यरत २३ कर्मचाऱ्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून ११ महिन्याच्या करारतत्वाप्रमाणे सेवा सुरु ठेवणेस हरकत नसुन पुढील ११ महिन्याची पुर्ननियुक्ती देणेस व याकामी अंदाजित येणाऱ्या रु.७०,०१,८८१/- इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५५८ — दिनांक : ०२/०३/२०२१

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय :-** प्रभाग समिती अे मधील आगाशी पूरापाडा प्रभाग क्र.१५ मध्ये विरार आगाशी मुख्य रस्ता ते पूरापाडा स्मशानापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे. (प्रथम फेर निविदा) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-**

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४१,४६,३४२/-
२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती ठराव क्र.२० दि.२०/४/२०१८
३) तांत्रिक मान्यता :- शहर अभियंता दि.२०/०४/२०१८
४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.४१,४६,३४२/-
५) जाहिर निविदा सुचना :- १) दै. The Economic Times, २) दै.महानगर, ३) दै.लोकमत — दि.२/६/२०१९
६) जाहिर निविदा सुचना (फेर निविदा) :- १) दै.वार्ताहर, २) दै.फ्रि प्रेस जर्नल, ३) दै.मुंबई मित्र — दि.३०/०८/२०१९
७) ई-निविदा प्राप्त :- २
८) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१७/०९/२०१९
९) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२४/१२/२०१९
१०) प्राप्त निविदांची संख्या :- २
११) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे.मेहूल अरविंद वर्तक | अंदाजपत्रकापेक्षा १५.००%.जास्त दराने | पात्र |
| २. | मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को. | अंदाजपत्रकापेक्षा ७.०१% जास्त दराने | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (७.०१%) जास्त दराची** निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी आहे. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम राज्य दर सन २०१७-१८ नुसार बनविण्यात आले आहे. लघुत्तम निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांनी भरलेल्या निविदा रक्कमेची **(रु.३९,६१,६२०/-)** सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या दर सूची सन २०१८-१९ च्या दरानुसाराच्या रक्कमेची **(रु.४०,७८,८३६/-)** तुलना केली असता सदर रक्कम (+) **३.१७% ने जास्त** आहे.

तरी सदर कामी निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** हे काम करण्यास पात्र असून त्यांना दि.१४/०२/२०२० रोजी वाटाघाटीचे पत्र देऊन निविदाधारकास वाटाघाटीने काम करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार दि.१७/०२/२०२० रोजी निविदा समिती मध्ये चर्चा झाली असता सदर निविदाधारक **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांनी सदर काम (वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा ६.६०% जास्त दराने काम करण्यास समर्थता दर्शविली आहे. तसेच याबाबत दि.१७/०२/२०२० रोजी पत्र दिले आहे.

मा.आयुक्त सो यांच्या दि.२६/०२/२०२१ रोजीच्या मंजूर टिपणी नुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने करावयाचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दि.०१/०३/२०२१ ठेकेदारास सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस कळविले आहे. त्यानुसार ठेकेदाराने दि.०२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अंदाजपत्रकीय दराने करावयास समर्थता दर्शविली आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को.** यांच्या निविदेतील **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय दराने** मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-** उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२० दि.२०/४/२०१८ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.राठोर भाग्यजीत** ॲण्ड **को.** ह्यांचे **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.राठोर भाग्यजीत** ॲण्ड **को.** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५५८ दिनांक : ०२/०३/२०२१

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय** :- विरार (प.) प्रभाग क्र.३४ मध्ये नवापुर चार रस्ता ते मोठामहालपाडा पर्यंत रस्त्याची साईड पट्टी खडीकरण व डांबरीकरण करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर** :- १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१५,४९,६७३/-
२) प्रशासकीय मंजूरी :- मा.स्थायी समिती ठराव क्र.३३ दि.३/६/२०१९
३) तांत्रिक मान्यता :- कार्यकारी अभियंता दिनांक.२७/६/२०१९
४) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रु. :- रु.१५,४९,६७३/-
५) जाहिर निविदा सुचना (फेर निविदा) :- १) दै.प्रहार २) दै.मिड-डे ३) दै.पूर्णविराम } दि.३०/८/२०१९
६) ई-निविदा प्राप्त :- ३
७) ई-निविदा उघडल्या (प्रथम लखोटा) :- दि.१७/९/२०१९
८) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२०/१२/२०१९
९) प्राप्त निविदांची संख्या :- ३
१०) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १. | मे.मेहूल अरविंद वर्तक | अंदाजपत्रकापेक्षा १५.००% जास्त दराने | पात्र |
| २. | मे.आशिर्वाद कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा १८.००% जास्त दराने | पात्र |
| ३. | मे.राठोर भाग्यजीत ॲण्ड को. | अंदाजपत्रकापेक्षा २५.००% जास्त दराने | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.मेहूल अरविंद** वर्तक यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (१५.००%) जास्त दराची** निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी आहे. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम राज्य दर सन २०१७-१८ नुसार बनविण्यात आले आहे. लघुत्तम निविदाधारक **मे.मेहूल अरविंद वर्तक** यांनी भरलेल्या निविदा रक्कमेची **(रु.१५,९१,१८९/-)** सद्यस्थितीत प्रचलित असलेल्या दर सूची सन २०१८-१९ च्या दरानुसाराच्या रक्कमेची **(रु.१५,२३,५०१/-)** तुलना केली असता सदर रक्कम (-) ४.८९% **ने कमी** आहे. सोबत तुलनात्मक तक्ता जोडला आहे.

तरी सदर कामी निविदाधारक **मे.मेहूल अरविंद वर्तक** हे काम करण्यास पात्र असून त्यांना दि.१४/०२/२०२० रोजी वाटाघाटीचे पत्र देऊन निविदाधारकास वाटाघाटीने काम करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार दि.१७/०२/२०२० रोजी निविदा समिती मध्ये चर्चा झाली असता सदर निविदाधारक **मे.मेहूल अरविंद वर्तक** यांनी सदर काम (वाटाघाटीने) अंदाजपत्रकापेक्षा १०.११% जास्त दराने काम करण्यास समर्थता दर्शविली आहे. तसेच याबाबत दि.१७/०२/२०२० रोजी पत्र दिले आहे.

मा.आयुक्त सो यांच्या दि.२६/०२/२०२१ रोजीच्या मंजूर टिपणी नुसार सदर काम अंदाजपत्रकीय दराने करावयाचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार दि.०१/०३/२०२१ ठेकेदारास सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेस कळविले आहे. त्यानुसार ठेकेदाराने दि.०२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये अंदाजपत्रकीय दराने करावयास समर्थता दर्शविली आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.मेहूल अरविंद वर्तक** यांच्या निविदेतील **(वाटाघाटीने)** अंदाजपत्रकीय दराने मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-** उपरोक्त कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३३ दि.३/६/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.मेहूल अरविंद वर्तक** ह्यांचे **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.मेहूल अरविंद वर्तक** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **(वाटाघाटीने) अंदाजपत्रकीय दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५६० दिनांक : 02/03/2022

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय :-** वॉर्ड क्र.३५ मध्ये वटार येथील जि.प. शाळेजवळ समाज मंदिर बांधणे. (मा.आ.श्री.हितेंद्रजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन २०१८-१९) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-**
१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३९,८४,०८८/-
२) प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारी पालघर :- आदेश क्र.जिनिस/ आस्थाविका / २०१८-१९/५८७ दि.८/३/२०१९
३) प्रशासकीय मंजूरी :-मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९
४) तांत्रीक मंजूरी :- शहर अभियंता दि.०५/०३/२०१९
५) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३९,८४,०८८/-
६) ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७३/२०१९-२० दि.२३/०८/२०१९ शहर अभियंता, वसई - विरार शहर महानगरपालिका
७) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.२४/०८/२०१९
८) वृत्तपत्राचे नाव :- १) दै.लोकमत
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.पूर्णविराम
९) वृत्तपत्रातील ई-निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक (प्रथम मुदतवाढ) :- दि.१२/०९/२०१९
१०) वृत्तपत्राचे नाव (प्रथम मुदतवाढ) :- १) दै.लोकमत
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.पूर्णविराम
११) विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ३
१२) ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.३१/१०/२०१९
१३) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२०/१२/२०१९
१४) प्राप्त निविदांची संख्या :- ३
१५) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.मेहूल अरविंद वर्तक | अंदाजपत्रकापेक्षा (-) ७.००% कमी दराने | -- | पात्र |
| २. | मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा ५.००% जास्त दराने | -- | पात्र |
| ३. | मे.जोजल जोसेफ लोपीस | अंदाजपत्रकापेक्षा (-) ९.२५% कमी दराने | परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे. | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.जोजल जोसेफ लोपीस** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** ((-) ९.२५%) कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

सदर निविदा दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा** (-) ९.२५% सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदा दर मंजूर करण्यात आले आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.जोजल जोसेफ लोपीस** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय **दरापेक्षा (-) ९.२५% कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-**

उपरोक्त कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.जोजल जोसेफ** लोपीस ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ९.२५% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.जोजल जोसेफ लोपीस** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ९.२५% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक

वसई – विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५६९ दिनांक : ०२/०३/२०२३

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय :-** विरार (प.) येथे आरक्षण क्र.१४२ गार्डन विकसीत करणे. (मा.आ.श्री.क्षितीजजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन २०१८-१९) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-** १) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४९,७५,१३६/-

२) प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारी पालघर :- आदेश क्र.जिनिस/ आस्थाविका / २०१८-१९/५८७ दि.८/३/२०१९

३) प्रशासकीय मंजूरी :- मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९

४) तांत्रीक मंजूरी :- शहर अभियंता दि.०५/०३/२०१९

५) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.४९,७५,१३६/-

६) ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७३/२०१९-२० दि.२३/०८/२०१९ शहर अभियंता, वसई - विरार शहर महानगरपालिका

७) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.२४/०८/२०१९

८) वृत्तपत्राचे नाव व पृष्ठ क्रमांक :- १) दै.लोकमत
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.पूर्णविराम

९) विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- २

१०) ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.३१/१०/२०१९

११) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२३/०१/२०२०

१२) प्राप्त निविदांची संख्या :- २

१३) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अभय बी.जाधव | अंदाजपत्रकापेक्षा (-) १०.००% कमी दराने | -- | पात्र |
| २. | मे.बालाजी इन्फ्राप्रोजेक्टस | अंदाजपत्रकापेक्षा (-) १४.९९% कमी दराने | परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे. | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.बालाजी इन्फ्राप्रोजेक्टस** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ((-) १४.९९%)** कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

सदर निविदा दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १४.९९%** सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदा दर मंजूर करण्यात आले आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.बालाजी इन्फ्राप्रोजेक्टस** यांच्या निविदेतील **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १४.९९% कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-**

उपरोक्त कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.बालाजी इन्फ्राप्रोजेक्टस** ह्यांचे अंदाजपत्रकीय **दरापेक्षा (-) १४.९९% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.बालाजी इन्फ्राप्रोजेक्टस** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १४.९९%** कमी दराने काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.४०१ ३०५
दुरध्वनी – ०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

विभाग :- सार्व.बांधकाम विभाग

निविदा दर मंजूरी ठराव क्र. ५६२ दिनांक : ०२/०३/२०२२

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय :-** वॉर्ड क्र.३५ मध्ये कोफराड येथील जि.प. शाळेजवळ समाज मंदिर बांधणे. (मा.आ.श्री.हितेंद्रजी ठाकूर यांच्या फंडाअंतर्गत (सन २०१८-१९) या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणे बाबत.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-**

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३९,८४,०८८/-
२) प्रशासकीय मान्यता मा.जिल्हाधिकारी पालघर :- आदेश क्र.जिनिस/ आस्थाविका / २०१८-१९/७८९ दि.८/३/२०१९
३) प्रशासकीय मंजूरी :- मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९
४) तांत्रीक मंजूरी :- शहर अभियंता दि.०५/०३/२०१९
५) तांत्रिक मान्यते अंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.३९,८४,०८८/-
६) ई- टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/३७३/२०१९-२० दि.२३/०८/२०१९ शहर अभियंता, वसई - विरार शहर महानगरपालिका
७) वृत्तपत्रातील निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक :- दि.२४/०८/२०१९
८) वृत्तपत्राचे नाव :- १) दै.लोकमत
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.पूर्णविराम
९) वृत्तपत्रातील ई-निविदा सूचना प्रसिध्दी दिनांक (प्रथम मुदतवाढ) :- दि.१२/०९/२०१९
१०) वृत्तपत्राचे नाव (प्रथम मुदतवाढ) :- १) दै.लोकमत
२) दै.फ्रि प्रेस जर्नल
३) दै.पूर्णविराम
११) विहीत मुदतीत ऑन लाईन प्रकीयेव्दारे प्राप्त निविदा :- ४
१२) ई - टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.३१/१०/२०१९
१३) ई-निविदा उघडल्या (द्वितीय लखोटा) :- दि.२०/१२/२०१९
१४) प्राप्त निविदांची संख्या :- ४
१५) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा दर | निविदेचा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्युरीटीबाबत धनाकर्षाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.सुरेश एन्टरप्रायजेस | अंदाजपत्रकापेक्षा ३.००% जास्त दराने | -- | पात्र |
| २. | मे.आयुष कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा (-) ७.६५% कमी दराने | परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष सोबत सादर केला आहे. | पात्र |
| ३. | मे.महावीर इंटरप्रायझेस | अंदाजपत्रकापेक्षा (-) ७.००% कमी दराने | -- | पात्र |
| ४. | मे.अंजनी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकापेक्षा २.००% जास्त दराने | -- | पात्र |

उपरोक्त निविदाधारकाची निविदेत भरलेल्या दरांची तुलना करता **मे.आयुष कन्स्ट्रक्शन** यांच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ((-) ७.६५%)** कमी निविदा ही तुलनात्मक दृष्टया इतर निविदाधारकापेक्षा कमी असून योग्य व वाजवी आहे.

सदर निविदा दर **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ७.६५%** सर्वात कमी व वाजवी आहे. सदर निविदा दर मंजूर करण्यात आले आहे.

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.आयुष कन्स्ट्रक्शन** यांच्या निविदेतील अंदाजपत्रकीय **दरापेक्षा (-) ७.६५% कमी** दरास मान्यता देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणेस मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्यापुढे ठेवणेस मंजूरीस्तव शिफारस असे.

**ठराव / निर्णय :-**

उपरोक्त कामास मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१२ दि.२०/६/२०१९ अन्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिद्ध करुन सकारात्मक दृष्ट्या पाहता **मे.आयुष** कन्स्ट्रक्शन ह्यांचे **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ७.६५% कमी दराने** हे दर कमी व योग्य असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त तथा प्रशासक **मे.आयुष कन्स्ट्रक्शन** ह्यांना अंदाजपत्रकीय दराच्या **अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) ७.६५% कमी दराने** काम करण्यास, कार्यादेश देण्यास, संविदा करणेस व नामंजूर ठेकेदाराची इसारा रक्कम परत करणेस मान्यता देत आहेत.

आयुक्त तथा प्रशासक
वसई – विरार शहर महानगरपालिका

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र .५६३ विभाग : बांधकाम विभाग

दिनांक : ०२/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू) प्रभाग क्र.१९ मधील बहुउद्देशिय इमारतीमध्ये पॉलिकार्बोनेट शिट बसविणे व शेड बनविणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

१) अंदाजपत्रकीय रक्कम :- रु.१०,५९,७५०/-

२) प्रशासकीय मंजूरी :-मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०, दि.१/०७/२०१९

३) तांत्रिक मान्यता व अंदाजत्रकीय रक्कम :- मा.कार्यकारी अभियंता पृष्ठ.क्र.१/२,दि.२/०८/२०१९ रु.१०,५९,७५०/-

४) जाहिर निविदा सुचना :- १) दै. वार्ताहर
२) दै .मिड-डे
३) दै.पूर्णविराम

५) ई-निविदा प्राप्त :- दि.०४/०९/२०१९

६) ई-निविदा उघडल्या [प्रथम लखोटा] :- दि. ०५ /०९ /२०१९
[द्वितीय लखोटा] :- दि.२२/११/२०१९

७) प्राप्त निविदांची संख्या :- ५

८) प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे :-

| अ.क्र | निविदा धारकाचे - नांव | निविदा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षो | निविदेचा दर अंदाजपत्रकिय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरीटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | **मे. अभय पाटील** | २.००% जास्त दराने | | -- |
| २. | **मे. अभय जाधव** | ०.३०% जास्त दराने | | -- |
| ३. | **मे. दानिश खान** | -९.००% कमी दराने | | -- |
| ४. | **मे.सुधाकर दातिर** | -१०.००% कमी दराने | DD no.११७११९ दि.२८/११/२०१९ | पात्र |
| ५. | **मे.रोशन जाधव** | -६.०१% कमी दराने | | -- |

९) लघुत्तम निविदा धारक व दर बाबत विभागाचा अभिप्राय :

उपरोक्त निविदांची तुलना केली असता **मे.सुधाकर दातिर** यांच्या निविदेतील **१०.००% कमी** दराची निविदा तुलानात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

सदर विषयावर दि. १७/१२/२०१९ रोजीच्या निविदा सभेत सविस्तर चर्चा करणेत आली असता **मे.सुधाकर दातिर** यांच्या अंदाजपत्रकापेक्षा १०.००% कमी दराच्या निविदेस शिफारस करणेत आलेली आहे. तसेच अंदाजपत्राकापेक्षा कमी दराची निविदा असल्याने **मे.सुधाकर दातिर यांचे मार्फत** सदर कामासाठी रु.१०५९८/- रक्कमेचा परफॉर्मन्स सिक्युरीटी धनाकर्ष क्र.११७११९ व्दारे मनपा फंडात जमा करणेत आलेला आहे.

तरी **मे.सुधाकर दातिर** यांच्या **१०.००% कमी** दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिक अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये मा.आयुक्त सो.हयांच्या मंजूरीने संविदा करणेकरिता शिफारस असे.

**प्रस्तावाचा निर्णय :-** सदर कामास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.१०, दि.०१/०७/२०१९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामाची जाहीर निविदा प्रसिध्द करुन सकारात्मक दृष्टया **मे.सुधाकर दातिर** यांच्या अंदाजपत्रकिय रकमेच्या **१०.००% कमी दराची** निविदा लघूत्तम आहे. महाराष्ट्र महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये सदर कामी मे.सुधाकर दातिर हयांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १०.००% कमी दराच्या निविदेस संविदा करणेस महानगरपालिकाचे कलम ७३ (क) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५६४ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०३/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय :-** उसगांव योजनेतील ७०० मी.मी. व्यासाची मुख्य जलवाहिनी मौजे उसगांव येथे रस्त्याच्या लगत भूमीगत अंथरण्यासाठी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या उसगांव पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी सन १९९६ साली महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत झालेली असून सदर योजनेअंतर्गत दोन उद्‌चंन केंद्र असून एक शिरवली नदी येथे व दुसरे उसगांव धरण येथे आहे. यापैकी उसगांव धरण ते जलशुध्दीकरण केंद्र पारोळ या ८ कि.मी. दरम्यान टाकण्यात आली असून सदर जलवाहिनी चेअरवर अंथरली आहे. सदर चेअरवर अंथरलेल्या जलवाहिनीमुळे काही विकासकांना, शेतकऱ्यांना आपल्या जागेत ये-जा करण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत त्यामुळे याभागातील शेतकरी, विकासक सदर जलवाहिन्या भूमीगत करण्यासाठी महापालिकेस सूचवित आहेत तसेच सदर योजनेच्या जलवाहिन्या अंथरून सुमारे २५ ते २६ वर्षाचा कालावधी लोटला असून जलवाहिन्यांच्या खालील चेअर बऱ्याच ठिकाणी नादुरूस्त असून PAC प्रकारच्या जलवाहिन्या टप्प्या-टप्प्याने बदलण्याबाबत IIT मुंबई या संस्थेने केलेल्या रचनात्मक परिक्षणातील अहवालात नोंदविला आहे. त्यानुसार PAC जलवाहिन्या अंथरण्याचा स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे.

मौजे उसगांव येथील सर्व्हे क्र. ७७/१, ७८/१, ७८/२, ७८/४, ११७ येथील जागा मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. या कंपनीच्या मालकीची असून सदर जागेत त्यांना औद्योगिक वसाहत उभारवयाची आहे. याकरीता त्यांना त्यांच्या जागेत येण्या-जाण्यासाठी ९ मीटर रुंद रस्त्याची आवश्यकता असून पारोळ ते उसगांव या दरम्यान चेअरवर अंथरलेली उसगांव योजनेची ७०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी त्यांच्या रस्त्याच्या मध्ये येत आहे व त्यांना अन्य ठिकाणाहून जागेत ये-जा करण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने त्यांनी दि.१४/०१/२०२१ च्या पत्रान्वये त्यांच्या जागेसमोरील ७५ मीटर जलवाहिनी भुमीगत अंथरण्याबाबत महापालिकेस कळविले असून याकामी येणारा खर्च ते महापालिकेस आगाऊ भरणा करणार असल्याबाबत कळविले आहे. वरील एम.एस. प्रकारची ७०० मी.मी. व्यासाची ७५ मीटर जलवाहिनी भुमीगत टाकणे कामी येणारा खर्च अर्जदार महापालिकेस देणार असल्याने महापालिकेच्या आर्थिक खर्चाची बचत होणार आहे.

पारोळ ते उसगांव या दरम्यान मौजे उसगांव येथील सर्व्हे क्र. ७७/१, ७८/१, ७८/२, ७८/४, ११७ येथील जागेसमोर उसगांव योजनेतील ७०० मी.मी. व्यासाची ७५ मीटर जलवाहिनी चेअरवर अंथरली असून मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांच्या जागेत जाण्या-येण्यासाठी अन्य कुठलाही रस्ता नसल्याने ७५ मीटर इतकी जलवाहिनी मे.प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांच्या मालकीच्या जागेतून (रस्त्याच्या कडेला) भुमीगत अंथरणे आवश्यक आहे. याकामी सन २०१९-२० च्या मजीप्राच्या दरसुचीनुसार रक्कम रू.२१,०२,६२०/- खर्चाचे (ETP खर्चासह) अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर

खर्च आगाऊ महापालिकेकडे भरणा करण्यास मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. हे तयार आहेत.

सदर खर्च मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांनी महापालिकेस भरणा केल्या नंतर पाणी पुरवठा विभाग मुख्यालयाकडे सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे कामी मंजूर असलेल्या निविदेअंतर्गत पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.के.आर.कन्स्ट्रक्शन यांना उपरोक्त कामी कार्यादेश देऊन काम करून घेणे शक्य आहे. मंजूर निविदा दरानुसार याकामी रू.२०,४५,७९२/-इतका खर्च अपेक्षित असून सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील "विकास निधी अंतर्गत शहरांतर्गत जलवाहिनी व्यवस्था" यालेखाशिर्षावरील उपलब्ध तरतुद मधून खर्च भागविणे शक्य आहे.

तरी मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार उसगांव योजनेची ७०० मी.मी. व्यासाची ७५ मीटर जलवाहिनी मौजे उसगांव सर्व्हे क्र. ७७/१, ७८/१, ७८/२, ७८/४, ११७ या जागेसमोरील चेअरवर अंथरलेली जलवाहिनी भुमीगत अंथरणेकामास, अंदाजपत्रकीय रक्कम मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि यांच्याकडून स्विकारण्यास तसेच सदर जलवाहिनी भूमीगत अंथरणे कामी सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे कामी मंजूर असलेल्या निविदेअंतर्गत पॅनल वरील मंजूर ठेकेदार मे.के.आर.कन्स्ट्रक्शन यांना कार्यादेश देऊन काम करून घेण्यास व मंजूर निविदा दरानुसार येणाऱ्या खर्चास मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

---

**ठराव :-**

१. IIT मुंबई या संस्थेने केलेल्या रचनात्मक परिक्षणातील अहवालात उसगांव योजनेतील अस्तित्वातील जलवाहिन्या व त्याखाली असलेल्या चेअर नादुरूस्त असून त्या दुरूस्ती करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय नोंदविले आहे. त्यानुसार कार्यवाही हाती घेणे आवश्यक आहे.

२. पारोळ ते उसगांव या दरम्यान उसगांव सर्व्हे क्र. ७७/१, ७८/१, ७८/२, ७८/४, ११७ या जागेसमोरील चेअरवर अंथरलेली जलवाहिनी भुमीगत टाकण्यासाठी मे. प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांनी विनंती केली असून याकामाचा अंदाजपत्रकीय खर्च रू.२१,०२,६२०/- ते भरणा करण्यास तयार आहेत त्यामुळे महापालिकेच्या खर्चाची बचत होणार आहे.

३. पारोळ ते उसगांव दरम्यान अस्तित्वातील ७०० मी.मी. व्यासाची ७५ मीटर चेअरवर अंथरलेली जलवाहिनी भुमीगत टाकण्यास मान्यता देण्यात येत असून सदर खर्च मे.प्रिफेक्ट पॅकेजींग प्रा.लि. यांचेकडून भरणा करून घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**४.** वरील प्रमाणे रक्कम भरणा केल्यानंतर अंदाजपत्रकास सक्षम तांत्रिक मान्यता घेऊन सदर जलवाहिनी भुमीगत अंथरणेकामी सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षात महानगरपालिका क्षेत्रात आवश्यकतेनुसार विविध व्यासाच्या जलवाहिन्या अंथरणे या पॅनलवरील मंजूर ठेकेदार मे.के.आर.कन्स्ट्रक्शन यांना निविदा मंजूर दराने काम करण्यासाठी कार्यादेश देण्यास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,विरार (पूर्व),जि-पालघर,पिन नं -४०१ ३०५

ठराव क्र. : ५६५ दिनांक :-०३/०३/२०२१

**विषय**:- महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता महानगरपालिका परिवहन सेवेचा वार्षिक मोफत पास योजनेकरिता महिला व बालकल्याण विभागामार्फत ५० % वित्तीय सहाय्य परिवहन सेवेस अदा करणे व याकरिता येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महानगरपालिका हद्दीत बऱ्याच जि.प. व खाजगी शाळा अस्तित्वात आहेत. या शाळेमध्ये अंदाजे २०००० ते २५००० विद्यार्थी शिक्षण घेत असतात. सदर विद्यार्थी आपल्या घरापासून ते शाळेपर्यंत दररोज २ ते ३ कि.मी. अंतरावर ये-जा करत असतात, व या विद्यार्थ्यांना राज्य परिवहन मार्गाच्या बसेस सेवा उपलब्ध नसतात. त्यामूळे मुलांना रोज खाजगी वाहनाने किंवा पायी चालत यावे लागते. त्यामूळे बरेच विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू शकतात. त्यामूळे सदरच्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याची बाब विचाराधीन आहे.

या बाबीचा विचार करुन महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेत (इंग्रजी माध्यम वगळून) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना महानगरपालिका परिवहन सेवेचा महानगरपालिकेकडून ५० % दराने विद्यार्थ्यांकरिता मोफत पास योजना राबविल्यास मुलांच्या शैक्षणिक खर्चात मदत होऊन शाळा गळतीचे प्रमाण कमी होऊ शकते. ५० % वित्तीय सहाय्य देण्याबाबत मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. २०, दिनांक २०/०२/२०१६ अन्वये धोरणात्मक निर्णयास मान्यता देण्यात आली आहे.

या योजनेकरीता सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महानगरपालिका हद्दीतील विविध शाळेतील अंदाजे ८६७७ विद्यार्थ्यांकरिता वार्षिक पास पुरवठा करणेकामी ३,५७,९०,८५०/- रुपये खर्च झालेला आहे.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५:प्र.क्र.१५६/०५/नवि-२०, दिनांक ३० डिसेंबर, २००६ मधील शासन निर्णयामध्ये शेवटच्या परिच्छेदमध्ये शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करुन राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकेच्या मा. आयुक्तांना राहील, असे नमूद केले आहे. यानुसार सदरचा प्रस्ताव सादर करणे योग्य होऊ शकते.

सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अर्थसंकल्पातून लेखा सांकेतांक ७२२-२७४१ विद्यार्थ्यांसाठी मोफत बस पास योजना (५ % म.व.बा.क.स) या लेखाशिर्षकात ३,७०,००,०००/- रुपये इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीतून सदर योजनेकरिता खर्च करण्यांत येईल.

राज्यशासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने इ. ९वी ते १० वी पर्यंत शाळा सुरू करण्यास शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०२०/प्र.क्र.१४०/एसडी-६, दिनांक १० नोव्हेंबर, २०२० अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मा. आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी जावक क्र. व.वि.श.म./आका/९५/२०२०, दिनांक ३१/१२/२०२० रोजीच्या परिपत्रकानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील इ. ९वी ते १२वी चे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यानुसार इ.९वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकरिता व होणाऱ्या खर्चास मान्यता दयावी.

तसेच राज्यशासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने इ. ५वी ते ८वी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यास शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण २०२०/प्र.क्र.२०४/एसडी-६, दिनांक १८ जानेवारी, २०२१ अन्वये मान्यता

देण्यात आली आहे. त्यानुसार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी दिनांक २७/०१/२०२१ पासून महानगरपालिका क्षेत्रातील इ.५वी ते ८ वी पर्यंतचे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे या बाबत दिनाक ०१/०२/२०२१ रोजी जाहीर सूचना देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे १ ली ते ४ थी चे वर्ग मार्च,२०२१ पासून सुरू होण्याची शक्यता आहे. यासाठी साधारण २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता सन २०१९-२० या वर्षाचा मोफत बस पास योजनेला झालेल्या खर्चाचा अंदाज घेता दोन महिन्यांसाठी अंदाजित ५५ शाळांमधील अंदाजे ८५०० ते ९००० इतके विद्यार्थी गृहीत धरल्यास दोन महिन्यांकरिता शालेय विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकरिता अंदाजित ६५,००,०००/- अक्षरी (पासष्ट लक्ष रुपये मात्र) खर्च अपेक्षित आहे.

तरी सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात दोन महिन्यांकरिता वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील शालेय विद्यार्थ्यांना मोफत बस पास देण्याकामी व येणाऱ्या अंदाजे ६५,००,०००/- अक्षरी (पासष्ट लक्ष रुपये मात्र) खर्चास मान्यता देण्याकामी आपल्या मंजूरीस्तव सादर.

**<u>निर्णय :-</u>** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकत असणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांची घरे शाळेपासून २ ते ३ कि. मी अंतरापेक्षा जास्त आहेत आशा विद्यार्थ्यांना मोफत बस पास या योजनेचा लाभ देण्यात यावा. शाळेच्या मागणी नुसार पात्र लाभार्थ्याना महिला व बालकल्याण विभागा मार्फत महानगरपालिका हद्दीतील सर्व भाषिक शाळेतील (इंग्रजी माध्यम वगळून) शाळेत शिकणाऱ्या इ.१ ली ते १० वी च्या विद्यार्थांना महानगरपालिकेच्या परिवहन सेवेचा ५०% दराने दोन महिन्या करिता येणाऱ्या अंदाजे ६५,००,००० /- अक्षरी (पासष्ट लक्ष रुपये मात्र) अपेक्षित खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.)
प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिक

वसई-विरार शहर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.पालघर, पिन नं.-४०१ ३०५
दुरध्वनी-०२५० २५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स- ०२५० २५२५१०७
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ५६६६

विभाग :- विधी
दिनांक :- ०३/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेतुन २९ गावे वगळणेसंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.४४२०/२०११ च्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या वतीने दावा चालविण्याकरीता वकिल व सिनियर काऊंसिलर यांची नव्याने नियुक्तीबाबत

**प्रस्तावाचा मजकुर** :- वसई विरार शहर महानगरपालिकेची स्थापना ०३ जुलै २००९ रोजी वसई तालुक्यातील ४ नगरपरिषदा व ५३ ग्रामपंचायती मिळून करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग अधिसूचना क्रमांक-वविम-२००९/८८/प्र.क्र.२४४/०९ नवि-२३ दि.३१ मे २०११ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ-मध्य उप-विभाग मध्ये अधिसूचना प्रसिध्द करून वसई-विरार शहरामधून २९ गावे वगळण्यात आलेली होती. मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४, दिनांक ०७/०६/२०११ अन्वये उक्त शासन अधिसुचने विरूध्द मा.उच्च न्यायालयात दावा दाखल करणेचे व त्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्याचे सर्व अधिकार मा.महापौर महोदय यांना देण्याचा ठराव मंजुर करण्यात आलेला होता. त्यानुसार महापौर महोदय यांनी उक्त शासन अधिसुचने विरोधात मा.उच्च न्यायालय येथे दावा दाखल केलेला आहे.

संदर्भिय याचिका क्र.४४२०/२०११ बाबतीत महानगरपालिकेच्या वतीने दावा चालविणेकरीता मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.३०४ दिनांक ११/०९/२०१९ अन्वये नियुक्त महानगरपालिकेच्या विधी पॅनेलवरील वकिल ॲड.स्वाती सागवेकर यांना वकिलपत्र देण्यात आलेले असुन त्यासोबतच विधी पॅनेलवरील सिनियर काऊंसिलर ॲड.अतुल दामले यांना नेमल्याचे दिसुन येत आहे.

तथापि, संदर्भिय याचिका क्र.४४२०/२०११ याकामी नियुक्त वकिल ॲड.स्वाती सागवेकर व सिनियर काऊंसिलर ॲड.अतुल दामले यांचे ऐवजी इतर सनदी वकील नियुक्त करणे आवश्यक वाटत आहे. याकामी मुंबई उच्च न्यायालयातील वकील ॲड.तानाजी म्हातुगडे व सिनियर काऊंसिलर ॲड.अनिल अंतुरकर यांना भ्रमणदुरध्वनीव्दारे विचारणा केली असता त्यांनी काम करणेस संमती दर्शविलेली आहे.

तरी मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्र.४४२०/२०११ याकामी नियुक्त वकिल ॲड.स्वाती सागवेकर व सिनियर काऊंसिलर ॲड.अतुल दामले यांचे ऐवजी ॲड.तानाजी म्हातुगडे व सिनियर काऊंसिलर ॲड.अनिल अंतुरकर यांची नेमणुक करणे व याकामी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.०४, दि.१३/०१/२०१७ नुसार फी दर लागु करून कार्यादेश देणेकामीचा प्रस्ताव प्रशासकिय व आर्थिक मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिकेतुन २९ गावे वगळणेसंदर्भात मुंबई उच्च न्यायालयातील याचिका क्र.४४२०/२०११ याकामी नियुक्त वकिल ॲड.स्वाती सागवेकर व सिनियर काऊंसिलर ॲड.अतुल दामले यांचे ऐवजी ॲड.तानाजी म्हातुगडे व सिनियर काऊंसिलर ॲड.अनिल अंतुरकर यांची नेमणुक करणे व याकामी मा.सर्व साधारण सभा ठराव क्र.०४, दि.१३/०१/२०१७ नुसार फी दर लागु करून कार्यादेश देणेस प्रशासकिय व आर्थिक मंजुरी देण्यात येत आहे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

प/४८५

# वसई - विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५६७

विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०३ /०३ /२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा योजनांतर्गत जलशुध्दीकरण केंद्र व उपांगाच्या ठिकाणी पाणी शुध्दीकरणासाठी विविध रसायणे (क्लोरिन गॅस टनर व पी.ए.सी. ) पुरवठा करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | **रु. ३,५६,५३,४०४ /-**<br>**(१२% GST सह )** |
| प्रशासकीय मान्यता (महानगरपालिका) | :- | मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. १५<br>दि. २०/०१/२०२० |
| तांत्रिक मान्यता | :- | I/२८/२६५/२०१९-२० दि. १८/०३/२०२० |
| ई - टेंडरींग द्वारे प्रथम वेळ निविदा सुचना प्रसिद्धी | :- | वविशम/पापु/५९/२०२०<br>दि. ०९/०५/२०२० |
| वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा<br>ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- | दै. नवाकाळ, दै. आपल महानगर, दै. मिड डे, दै. प्रात:काल, दै. नवभारत,<br>दै. वृत्तमानस, दै. दि फ्री प्रेस जनरल |
| निविदा समिती | :- | दि. २५/०९/२०२० रोजीची बैठक<br>निर्णय :- १२% ऐवजी १८% GST लागू असल्याने GST वगळून निविदा प्रसिध्द करण्यास मंजूरी |
| मा. आयुक्त साहेब | :- | GST वगळून निविदा प्रसिध्द करणेकरीता<br>दि. २०/१०/२०२० रोजीची मंजूर टिपणी |
| **व्दितीय वेळ निविदा किंमत** | :- | **रु. ३,१८,३३,३९६/- (GST वगळुन)** |
| ई - टेंडरींग द्वारे व्दितीय वेळ निविदा सुचना प्रसिद्धी | :- | वविशम/पापु/ ३७३ /२०२०<br>दि. ०३/११/२०२० |
| वृत्तपत्रातील व्दितीय वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिद्धी | :- | दै. खबरे आजतक, दै.द फ्रि प्रेस जर्नल,<br>दै. महाराष्ट्र टाईम्स, दै.पुढारी,<br>दै. मिड डे दि. ०५/११/२०२० |
| ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) | :- | दि. २०/११/२०२० |
| विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा | :- | ०४ |
| प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी | :- | मा. शहर अभियंता |

पा४६८

ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची :- दि. १०/१२/२०२०
दिनांक ( व्दितीय लखोटा)

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र :- ०४
निविदाकार

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | निविदा धारकाचे नाव | निविदा दर + १८% GST |
|---|---|---|
| १ | **मे. जी.एस.कमर्शीअल** | **निविदा रक्कमेच्या दराने** |
| २ | मे. हितू केमीकल्स ॲण्ड अल्कली लि. | ४.५०% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) |
| ३ | मे. आयडीयल केमिकल इंडिया प्रा.लि. | ४.१०% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) |
| ४ | मे. एस व्ही. एस. केमिकल कॉर्पोरेशन | ३.७५% ( निविदा रक्कमेच्या जादा दराने ) |

उपरोक्त निविदाकारांनी भरणा केलेल्या दराची तुलना केली असता, मे. जी. एस. कमर्शीअल यांच्या निविदा रक्कमेच्या ३.६४% जादा दर हा इतर निविदा दरांपेक्षा कमी आहे. सदरचा देकार हा महापालिकेस जास्त वाटत असल्याकारणाने जा.क्र. वविशम/पापु/५२२ २०२१ दि. ०६/०१/२०२१ अन्वये वाआघाटी करीता निमंत्रीत केले होते. मे. जी. एस. कमर्शीअल यांनी वाटाघाटी अंती निविदा रक्कमेच्या **निविदा रक्कमेच्या दराने + १८% GST** सह काम करण्यास सहमती दर्शविली आहे. त्याअनुषंगाने सदर निविदेअंतर्गत एकूण रक्कम **रु. ३,७५,६३,४०७/-** इतका खर्च होणार आहे. दि. ०१/०२/२०२१ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीत मा.आयुक्त यांनी **निविदा रक्कमेच्या दराने** काम करण्याकरीता विचारणा केली असता मे. जी.एस.कमर्शीअल यांनी वाटाघाटी अंती निविदा रक्कमेच्या दराने काम करण्यास सहमत असल्याचे कळविले आहे. तरी **मे. जी. एस. कमर्शीअल** यांच्या निविदा रक्कमेच्या दरास मान्यता मिळणे करीता निर्णयास्तव निवीदा समितीपुढे सादर.

तरी **मे. जी. एस. कमर्शीअल** यांच्या निविदा रक्कमेच्या दराची निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, **मे. जी. एस. कमर्शीअल** यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव** :- उपरोक्त कामी **मे. जी. एस. कमर्शीअल** यांच्या **निविदा रक्कमेचा दर + १८% GST** ( भविष्यात सदरच्या GST मध्ये घट झाल्यास तत्कालिन GST बंधनकारक राहील ) निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी निविदा दर + १८% GST सह एकूण **रु. ३,७५,६३,४०७/-** खर्च अपेक्षित असुन अंतिम वित्तीय मान्यता तसेच मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

५/२६७

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि. - पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५६८ विभाग :- पाणी पुरवठा
दिनांक :- ०३/०३/२०२१

---

**प्रस्तावाचा विषय** :- सन २०२०-२१,२०२१-२२ या व्दिवार्षिक वित्तीय वर्षाकरीता वसई विरार शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना उसगाव / शिरवली २० द.ल.ली क्षमता योजनेच्या जलवाहिन्यांची देखभाल दुरुस्ती करणे कामी प्राप्त निविदापैंकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-**

| | | |
|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय रक्कम** | :- | **रु. ३३,६०,०००/-** |
| **प्रशासकीय मान्यता** | :- | मा. प्रशासक ठराव क्र. १५५ दि. ०७/१०/२०२० |
| **तांत्रिक मान्यता** | :- | I/१०/७७/ २०२०-२१ दि. १५/१०/२०२० |
| **ई - टेंडरींग द्वारे निविदा सुचना प्रसिद्ध** | :- | जा.क्र. वविशम/पापु/४६०/२०२० दि. ०८/१२/२०२० |
| **वृत्तपत्रातील प्रथम वेळ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविंदा प्रसिध्दी** | :- | दै. वृत्तमानस, दै. द फ्री. प्रेस, दै. लोकमत, दै. खबरे आज तक, दै. लोकसत्ता, दै. जागरुक टाईम्स, दै. मिड डे दि. ११/१२/२०२० |
| **ई - टेंडरींग द्वारे प्रथम मुदतवाढ निविदा सुचना प्रसिध्दी** | :- | जा.क्र. वविशम/पापु/५१६/२०२१ दि. ०४/०१/२०२१ |
| **वृत्तपत्रातील प्रथम वेळ मुदतवाढ जाहिर निविदा ई - टेंडरींग द्वारे निविदा प्रसिध्दी** | :- | दै. वृत्तमानस, दै. द फ्री. प्रेस, दै. लोकमत, दै. खबरे आज तक, दै. लोकसत्ता, दै. जागरुक टाईम्स, दै. मिड डे दि. ०५/०१/२०२१ |
| **ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा)** | :- | दि. १२/०१/२०२१ |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वार प्राप्त निविदा** | :- | ०४ |
| **प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी** | :- | मा. शहर अभियंता |
| **ई - टेंडरींग द्वारे निविदा उघडण्याची दिनांक ( व्दितीय लखोटा)** | :- | ०४/०२/२०२१ |
| **विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पात्र निविदाकार** | :- | ०३ |

प्राप्त निविदा निविदासमिती पुढे उघडल्या असता त्याचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र | निविदा धारकाचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| १ | **मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस** | **०.०३ % कमी दराने (वाटाघाटी अंती १.००% कमी दराने)** |
| २ | मे. कपिल एस ठाकूर | ७.०० % जादा दराने |
| ३ | मे. मानस कंन्स्ट्रक्शन | ४.९५ % जादा दराने |

उपरोक्त निविदांची तुलना केली असता, **मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस** यांच्या निविदेतील दर हा अंदाजपत्रकीय रक्कमेच्या ०.०३% कमी दर प्राप्त झाला असून सदरचा देकार हा महापालिकेस जास्त वाटत असल्याने दि.२५/०२/२०२१ रोजीच्या निविदा समितीच्या बैठकीत मा.आयुक्त यांनी **१.०० % कमी दराने** काम करण्याकरीता विचारणा केली असता **मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस** यांनी दि.२५/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये वाटाघाटी अंती १.००% कमी दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे.

तरी मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.००% कमी दराची निविदा योग्य व वाजवी असल्यामुळे, मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस यांच्याशी कामाची संविदा करणेस मान्यता देणेसाठी व वित्तीय मान्यतेस्तव मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या मान्यतेस्तव सादर.

---

**ठराव** :- उपरोक्त कामी मे. ॲशलॉन एन्टरप्रायसेस यांची वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय रक्कमेच्या १.०० % कमी दराच्या निविदेस निविदा समितीने मान्यता दिली असून मा. आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. सदर कामी मनपा तर्फे कायदेशिर बाबींची पुर्तता करुन संविदा करण्यास मा.आयुक्त तथा प्रशासक यांची मंजूरी असे.

**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि - पालघर , पिन नं. ४०१ ३०५
दूरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५६९ | विभाग :- बांधकाम
दिनांक : ४/३/२०२१

---

प्रस्तावाचा विषय :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलसाठी कॉक्रीट बेस तयार करणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई- विरार शहर महानगरपिलका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड मधल्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने नव्याने यंत्र सामुग्री पुरविण्यात आलेली आहे, यात डंम्पींग ग्राऊंड मध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या विभागजनासाठी ट्रॉमील्स मशीनचा समावेश आहे. सदर ठिकाणी नव्याने पुरविण्यात आलेली ट्रॉमील ठेवण्याकरीता अस्तित्वातील जुना काँक्रीट बेस अपूरा पडत असल्याने नव्याने काँक्रीट बेस तातडीने तयार करणे आवश्यक आहे. या कामाचे सन २०१९-२० चे वित्तिय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार रू. ६,१८,३९१/- अंदाजपत्रकीय रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंडसाठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलसाठी कॉक्रीट बेस तयार करणे कामी अंदाजपत्रकीय रु. ६,१८,३९१/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेत येत आहे. याकामी तांत्रिक मान्यता घेऊन जाहिर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करून ई-निविदा मागविण्यात यावी.

आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** ५७०

**विभाग :** बांधकाम विभाग
**दिनांक :** 04/03/ 2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड साठी नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमीलसाठी कॉक्रीट बेस तयार करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई- विरार शहर महानगरपिलका प्रभाग समिती (जी) हद्दीतील वॉर्ड क्र. ८८ मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड मधल्या कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने नव्याने यंत्र सामुग्री पुरविण्यात आलेली आहे, यात डंम्पींग ग्राऊंड मध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या विभागजनासाठी ट्रॉमील्स मशीनचा समावेश आहे.

सदर ठिकाणी नव्याने पुरविण्यात आलेली ट्रॉमील्स ठेवण्याकरीता अस्तित्वातील जुना कॉंक्रीट बेस अपूरा पडत असल्याने नव्याने कॉंक्रीट बेस तातडीने तयार करणे आवश्यक आहे, सदर ठिकाणी जागेची पाहणी करून रक्कम रू. ६,१८,३९१/- चे सन २०१९-२० च्या वित्तीय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य सुचीनुसार अंदाजपत्रक तयार करणेत आलेले आहे.

सबब, उपरोक्त ठिकाणी ट्रॉमील्स ठेवण्याकरीता नव्याने कॉंक्रीट बेस तयार करणेचे काम तातडीने करावयाचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. हमीद जे. शेख रा.- वसई (प) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त सा़ो. यांचे मंजूरीस्तव सादर.

---

**ठराव** :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (जी) वालीव कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र. 88 मधील भोयदापाडा डंम्पींग ग्राऊंड येथे नव्याने पुरविण्यात आलेल्या ट्रॉमील्ससाठी शेड बांधणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता मे. हमीद जे. शेख रा.- वसई (प) या नोंदणीकृत ठेकेदाराकडून जिल्हा दर सूची नुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकानुसार काम करून घेणेसाठी संविदा करण्यात कार्यादेश देण्यास मा. आयुक्त तथा प्रशासक सा़ो. यांची मंजूरी असे.

आयुक्त तथा प्रशासक
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकीय ठराव क्रं. ५७९ विभाग :- अग्निशमन

दिनांक :-०४/०३/२०२१

---

**विषय:**- अग्निशमन विभागातील ४० मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहनाची दुरुस्ती करणे करीता येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी व सदर कामी कार्यादेश देणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथे टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंचीचे अग्निशमन व जीवसंरक्षक वाहन क्रं. एम.एच.४८ सी, ००३२ कार्यरत आहे. परंतु टर्न टेबल लॅडर वाहनाचे लॅडर मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लॅडर ऑपरेट होत नाही असे वाहनचालक यांनी कळविले होते. सदर वाहनाची दुरुस्ती कामे करण्याकरीता लागणारे स्पेअरपार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका व लगतच्या पुणे, मुंबई या परिसरात नाही. सदर वाहन विदेशामधील ऑस्ट्रिया येथून विकत घेतले असल्याने त्यासाठी लागणारे स्पेअरपार्ट रोझनबार कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे उपलब्ध होतात. परंतू यापूर्वी गेली सात वर्ष सदर वाहनाचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यश्न प्रा.लि. कंपनीस देण्यात आला होता. सदर ए.एम.सी. ठेका माहे सप्टेंबर २०२० पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाहनाचे दुरुस्ती करीता ए.एम.सी. ठेका नाही.

त्यामुळे मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांना जा.क्रं. वविशम/अग्नि/मुका/६९१/२०२०, दिनांक १४/१२/२०२० अन्वये सदर वाहनाचे तपासणी करीता कार्यादेश देण्यात आला होता. त्यानुसार मे. ॲनलॉन् टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. बेंगलोर येथील कंपनीचे कुशल तांत्रिक अभियंता यांचेकडून टर्न टेबल लॅडर वाहनाची तपासणी केली असून त्यानुसार सर्व्हिस रिपोर्ट सादर केला असून रक्कम रु. ६,४०,०७५/- चे कोटेशन सादर केले आहे.

तसेच सदर वाहनाचे दुरुस्ती करीता कंपनीचे ०२ कुशल तांत्रिक अभियंता यांचे ३ दिवसासाठी सर्व करासह खर्च रक्कम रु. २,२१,०४९/- येणार आहे. असे एकुण रक्कम रुपये ८,६१,१२४/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्च करणे करीता सन २०१९-२० सह सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ८७ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** यामध्ये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

टर्न टेबल लॅडर वाहनाचे दुरुस्ती कामे करणे करीता स्पेटरपार्ट खरेदी करणेस रोझनबार कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून थेट विना निविदा खरेदी करणेस व येणा-या अंदाजीत रक्कम ८,६५,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार मंजुरी मिळणेस व मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांना कार्यादेश देणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर वाहनाची दुरुस्ती करीता लागणारे साहित्य रोझनबार कंपनीचे भारतातील एकमेव अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडून थेट विना निविदा खरेदी करणेस येणा-या रक्कम रु. ८,६५,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांना कार्यादेश देणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य् कार्यालय विरार (पूर्व), जि. पालघर, पिन नं. 401305**
**दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04 05/06 , फॅक्स् – 0250-2525107**
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

**प्रशासकीय ठराव क्र.** 572 **विभाग :** **बांधकाम विभाग**

**दिनांक :** 04 /03/ **2021**

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई- विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प) येथील जुन्या व नवीन प्रभाग समिती (ई) कार्यालयातील पहिल्या मजल्यावर टाईल्स् सोफा सेट व केबीन टेबल बसविणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सद्यस्थितीत जुने प्रभाग समिती (ई) व बी कार्यालयातील प्रभाग समिती (ई) चे कार्यालय वृंदावन गार्डन येथून स्थलांतरीत झाले असून प्रभाग समिती (ई) ऑफीसकरीता व जुन्या प्रभाग समिती (ई) (सद्यस्थितीत नवीन प्रभाग समिती "बी") ऑफीसकरीता पहिल्या मजल्यावर टाईल्स् सोफा सेट व केबीन टेबल बसविणे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

त्यानुसार सदर कामाचे रक्कम रू. 2,45,060/- इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| 1. | प्रभाग समिती (ई) ऑफीसकरीता व जुन्या प्रभाग समिती (ई) (सद्यस्थितीत नवीन प्रभाग समिती "बी") ऑफीसकरीता पहिल्या मजल्यावर टाईल्स् सोफा सेट व केबीन टेबल बसविणे | टाईल्स् सोफा सेट व केबीन टेबल<br>रू. 2,45,060/- |

ठराव :- उपरोक्त् नमुद कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजूरी घेऊन् पुढील निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देण्यात येत आहे.

Khandare
4/3/21.

उप आयुक्त
वसई- विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पूर्व ता .वसई, जि. पालघर पिन नं. ४०१ ३०५.

दुरध्वनी ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६ फॅक्स-०२५०-२५२५१०७.

ई मेल vasaivirarcorporation@yahoo.com


प्रशासकीय ठराव क्रं. ५७३

विभाग :- अग्निशमन

दिनांक :-०५/०३/२०२१

**विषय:**- अग्निशमन विभागातील ४० मीटर उंच शिडीचे टर्न टेबल लॅडर वाहनाच्या मर्सिडिझबेंझ ट्रक इंजिनमध्ये दुरुस्ती करणेस येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तिय मंजुरी व सदर कामी कार्यादेश देणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- सादर करण्यात येते की, वसई-विरार शहर महानगरपालिका मुख्य अग्निशमन केंद्र, आचोळे येथे टर्न टेबल लॅडर ४० मीटर उंचीचे अग्निशमन व जीवसंरक्षक वाहन क्रं. एम.एच.४८ सी ००३२ कार्यरत आहे. परंतु टर्न टेबल लॅडर वाहनाचे लॅडर मध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यामुळे लॅडर ऑपरेट होत नाही असे वाहनचालक यांनी कळविले होते. सदर वाहनाची दुरुस्ती कामे करण्याकरीता लागणारे स्पेअरपार्ट व वाहनाची दुरुस्ती करणारे तांत्रिक तज्ञ व सुविधा महानगरपालिका व लगतच्या पुणे, मुंबई या परिसरात नाही. सदर वाहन विदेशामधील ऑस्ट्रिया येथून विकत घेतले असल्याने त्यासाठी लागणारे स्पेअरपार्ट रोझनबार कंपनीचे एकमेव अधिकृत विक्रेते मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांचेकडे उपलब्ध होतात. परंतू यापूर्वी गेली सात वर्ष सदर वाहनाचे दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा ठेका मे. ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यश्न प्रा.लि. कंपनीस देण्यात आला होता. सदर ए.एम.सी. ठेका माहे सप्टेंबर २०२० पासून बंद करण्यात आला आहे. त्यामुळे सद्यस्थितीत वाहनाचे दुरुस्ती करीता ए.एम.सी. ठेका नाही.

टर्न टेबल लॅडर वाहनाचे चॅसिस मध्ये बिघाड झाल्यास पुणे, मुंबई तसेच लगतच्या परिसरात दुरुस्ती करीता गुगलवर शोध घेतला असता तांत्रिक अभियंता उपलब्ध नाही परंतु लगतच्या गुजरात राज्यात मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद हि कंपनी उपलब्ध असून सदर कंपनीकडे टर्न टेबल लॅडर वाहनाचे मर्सिडिझ्बेंझ ट्रक इंजिन मध्ये दुरुस्ती करावयाचे साहित्य उपलब्ध आहे.

टर्न टेबल लॅडर वाहनाची मर्सिडिझ्बेंझ चॅसिसवर बांधणी केलेली असल्याने इंजिन चॅसिस हा भाग ट्रक इंजिन चॅसिस असल्याने त्यामधील दुरुस्तीही मर्सिडिझ्बेंझ चे अधिकृत सर्व्हिस स्टेशनवर होत असल्याने मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांना दिनांक २०/१०/२०२० रोजी ई-मेल व्दारे कळविले असता सदर कंपनीचे कुशल तांत्रिक अभियंता यांनी दिनांक १३/१२/२०२० रोजी टर्न टेबल लॅडर वाहनाच्या चॅसिसची तपासणी केली व त्यानुसार दिनांक १९/०१/२०२१ रोजी सर्व्हिस रिपोर्ट सादर केला असून रक्कम रु. ३,१९,२५७/- कोटेशन सादर केले आहे.

तसेच मर्सिडिझ्बेंझ ट्रक इंजिन चॅसिस दुरुस्ती करीता सदर कंपनीचे कुशल तांत्रिक अभियंता साठी सर्व करासह शुल्क रक्कम रु. ४०,४००/- लागणार आहेत असे एकुण अंदाजीत रक्कम रुपये ३,६५,०००/- खर्च अपेक्षित आहे. तरी सदर खर्च करणे करीता सन २०१९-२० सह सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील पान क्रं. ८७ वरील ५ नंबरचे लेखाशिर्ष **अग्निशमन व्यवस्था वाहन दुरुस्ती निगा / कटर मशीन दुरुस्ती निगा** यामध्ये १ कोटी ५ लक्ष तरतुद असून यामधून सदर खर्च करता येईल.

तरी टर्न टेबल लॅडर वाहनाची मर्सिडिझ्बेंझ ट्रक इंजिन चॅसिस भारतातील मर्सिडिझ्बेंझचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांचेकडून थेट विना निविदा दुरुस्ती करणे कामी येणा-या रक्कम रु. ३,६५,०००/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) अन्वये मा. आयुक्त यांचे अधिकार व कर्तव्य नुसार मंजुरी मिळणेस व मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांना कार्यादेश देणेस मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस्तव सविनय सादर.

**ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर वाहनाची मर्सिडिझ्बेंझ ट्रक इंजिन चॅसिस भारतातील मर्सिडिझ्बेंझचे अधिकृत सर्व्हिस सेंटर मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांचेकडून थेट विना निविदा दुरुस्ती करणे कामी येणा-या रक्कम रु. ३,६५,०००/- खर्चास प्रशासकीय व वित्तिय मान्यता व मे. जीएमएमसीओ लिमिटेड, अहमदाबाद यांना कार्यादेश देणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) क अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार मान्यता देण्यात येत आहे

5/3

**आयुक्त तथा प्रशासक**

**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**

दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकिय ठराव क्र. 574

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :-05/03/2021

---

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील सर.डी.एम.पेटीट रुग्णालयातील नविन इमारतीत विद्‌युतीकरण करणे कामांस वित्तीय मान्यता मिळणेंबाबत.

---

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (आय) कार्यक्षेत्रातील सर.डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या इमारतीचे महानगरपालिका सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेमार्फत स्ट्रक्चर ऑडिट करण्यात आले होते. स्ट्रक्चर ऑडीटरने दिलेल्या सल्यानुसार सदर इमारतीचे मजबुतीकरण व दुरुस्तीचे काम बांधकाम विभागामार्फत सुरु करण्यात आले आहे.

बांधकाम विभागामार्फत तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकामध्ये सदर इमारतीचे अंतर्गत बांधकाम समावेशक बाबी अंतर्भुत आहेत. परंतु, सदर इमारतीतील इलेक्ट्रीक केबल्स व वायरर्स, पॅनल, विद्‌युतीय उपकरणे (जसे की, फॅन, टयुब,गिझर, हिटर इत्यादी) व पॉईंट वायरींग इत्यादी साहित्य जुने व नादुरुस्त झाले आहेत. तसेच, नविन बांधकाम करतेवेळी नव्याने विद्‌युतीकरणाचे कामे करणे देखिल गरजेचे आहे.

याकरिता, सदर इमारतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता खालील नमुद केलेप्रमाणे विद्‌युतीय कामे करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप / अंदाजंपत्रकीय रक्कम | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | सर.डी.एम.पेटीट रुग्णालयाच्या नविन इमारतीत विद्‌युतीकरण व त्याअनुषंगिक कामे करणे. | केसिंग केपिंग पट्टी-255 मी, बॉक्स टंकिंग-105 मी, 2x2.5 sq.mm वायर-255 मी, 2x4 sq.mm वायर-665 मी, मॉडयुलर स्वीच-133 नग, सॉकेट-137 नग, इंडिकेटर लॅम्प-30 नग, रेग्युलेटर-59 नग, कंसिल पॉईंट वायरिंग-60 नग, प्लग ऑन बोर्ड वायरिंग-29 नग, पॉईंट वायरिंग-118 नग, स्वतंत्र प्लग-46 नग, सरफेस एल.ई.डी.पॅनल-15 नग, स्क्वेअर सरफेस एल.ई.डी.पॅनल-18 नग, टयुब लाईट-83 नग, फ्लड लाईट-10 नग, फॅन-65 नग, एग्झॉस्ट फॅन-8 नग, गिझर-7 नग, 1.5 टन ए.सी-6 नग, 1 टन ए.सी-3 नग, SPMCB-71 नग, DPMCB-8 नग, FPMCB-14 नग, TPMDB-9 नग, एनक्लोझर-21 नग, RCCB-3 नग, केबल 2x4 sq.mm -90 मीटर, केबल.4x4 sq.mm-125 मीटर,अर्थींग-4 नग<br>अंदाजपत्रकीय रक्कम- 14,72,585/- | मे.किंजल इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त कामांचे सन 2019-2020 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्‌युत) जिल्हा दर सुचीनुसार एकुण रक्कम 14,72,585/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामी होणारा खर्च सन 2020-21 या वित्तीय वर्षातील "विकास निधी अंतर्गत रुग्णालय बांधकाम संबंधित कामे" या लेखाशिर्षकातील रक्कम 20,02,48,000/- रुपये तरतुदी मधुन भागविण्यात येईल.

सदर कामास मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.24/09/2020 रोजीचे ठराव क्र.129 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

तरी सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "आय" कार्यक्षेत्रातील सर.डी.एम. पेटीट रुग्णालयाच्या नविन इमारतीत विद्‌युतीकरण करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार मे.किंजल इलेक्ट्रीकल्स, वसई यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्‌युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 575

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 05/03/2021

**प्रस्तावाचा विषय** :- प्रभाग समिती (डी ) कार्यक्षेत्रातील श्वान निर्बिजीकरण केंद्र येथे विद्युतीकरण कामे करणे कामास वित्तीय मान्यता मिळणेबाबत

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील श्वान निर्बिजीकरण केंद्र येथे बांधकाम विभागामार्फत नवीन इमारत बांधणे काम सुरु करण्यात आले आहे. सदर इमारतीमध्ये प्रकाश व्यवस्था तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने विद्युत केंट्रोल पॅनल बसविणे, केबलिंग व्यवस्था व त्या अनुषंगिक विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील श्वान निर्बिजीकरण केंद्र येथे विद्युतीकरण कामे करणे | LED फिटींग 110w -120w -15 नग, LED पॅनल 300x 120mm 36W-18 नग, LED tubelight - 10 नग, led square-20W-12 नग, LED- 1 नग , स्ट्रीट लाईट फिटींग 100W-1 नग , celling फॅन- 6 नग , वॉल फॅन-4 नग, इंडस्ट्रियल फॅन-10 न, वातानुकूलित सयंत्र 1 टन-1 नग, वातानुकूलित सयंत्र 1 टन-2 नग एक्सहोस्ट फॅन-2 नग , इन्व्हर्टर - 1 नग , बॅटरी 2 नग, वॉटर हीटर 3ltr-1 नग , स्टॅबिलाईझर-3 नग , 4 कोर 6 sqmm कॉपर - 430 मीटर , 4 कोर 70 sqmm -90 मीटर , dwc pipe 75 मीटर, GI pipe पोल - 1 नग , फौंडेशन 1 नग , प्लेट एअर्थिंग -1, pipe अर्थिंग-1 नग<br>अंदाजपत्रकिय रक्कम :- 9,79,058/- | मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त कामांचे सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार एकुण रक्कम 9,79,058/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 67 (3) (क) अन्वये मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी दिनांक 22/01/2021 रोजीचे ठराव क्र.419 अन्वये प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

तरी सदर काम तातडीचे असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** प्रभाग समिती (डी ) कार्यक्षेत्रातील श्वान निर्बिजीकरण केंद्र येथे विद्युतीकरण कामे करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स, वसई** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर 5% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास कार्योत्तम मंजुरी देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई – विरार शहर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. 401 305**
दुरध्वनी – 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107,
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. 576

विभाग :- विदयुत विभाग
दिनांक :- 05/03/2021

**प्रस्तावाचा विषय** :- वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" कार्यालय हददीतील सातिवली येथील बस डेपो व परिसरात विद्युत व्यवस्था व त्याअनुषंगीक विद्युतीय कामे करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती "जी", कार्यालय हददीतील सातिवली येथे वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेचे बस डेपो तयार करण्यात आले आहे. याकरिता, सदर परिवहन इमारत व परिसरामध्ये विद्युत व्यवस्था व त्याअनुषंगिक खालील नमुद केलेले विद्युतीय कामे करणे आवश्यक आहे.

| काम क्र. | कामाचे नाव | कामाचे स्वरुप | ठेकेदाराचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | प्रभाग समिती "जी" कार्यालय हददीतील सातिवली येथील बस डेपो व परिसरात विद्युत व्यवस्था व त्याअनुषंगीक विद्युतीय कामे करणे | 9 मी टयुबलर पोल-16 नग, फाऊंडेशन-16 नग, 90 वॅट एल.ई.डी-14 नग, 150 वॅट एल.ई.डी-17 नग, डबल फिटींग ब्रॅकेट-7 नग, सिंगल फिटींग ब्रॅकेट- 9 नग, एफ.आर.पी-16 नग, 3x2.5स्के.एम.एम वायर-207 मी, ट्रेन्च-505 मी, DWC पाईप-537 मी, 4x25स्के.एम.एम केबल-569 मी, जी.आय.पाईप-25 मी, पाईप टाईप अर्थिंग-16 नग, मिनि फिडर पिलर-1 नग, | मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स |

उपरोक्त कामांचे सन 2019-20 या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दर सुचीनुसार एकुण रक्कम 9,91,903/- रुपयेचे अंदाजपत्रक बनविणेत आले आहे. सदर कामास दि. 05 / 03 /2021 रोजीचे जा.क्र.वविशम/विद्युत/385 /20-21 नुसार प्रशासकिय व वित्तीय मान्यता दिली आहे.

परिवहन सेवा ही महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची “ड” प्रकरण 4 “अत्यावश्यक सेवा” वर्ग-3 (ब) नुसार अत्यावश्यक सेवा वर्गात येत असल्याने वर नमुद केलेली विद्युतीय कामे तातडीने करणे आवश्यक आहे.

तरी सदर काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) प्रकरण 5 संविदा 2.2 नुसार निविदा न काढता वर नमुद केलेल्या शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदाराकडुन जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 10% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मा.आयुक्त सो., यांचे मंजुरीस्तव सादर.

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती "जी" कार्यालय हददीतील सातिवली येथील बस डेपो व परिसरात विद्युत व्यवस्था व त्याअनुषंगीक विद्युतीय कामे करणे करिता शासनाच्या नोंदणीकृत ठेकेदार **मे.साई वैभव इलेक्ट्रीकल्स, वसई** यांचे कडुन सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार तयार करणेंत आलेल्या अंदाजपत्रकीय रक्कमेवर 10% कमी दराने काम करुन घेण्यासाठी संविदा करुन कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(गंगाथरण डी)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र.५७८

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :०८/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय** :- वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत ६ महिन्याच्या कंत्राटी पद्धतीने व ११ महिन्याच्या कंत्राटी पद्धतीने कार्यरत सर्व तज्ञ वैद्यकीय अधिकारी, सर्व एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी व बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी यांच्या मानधनात वाढ करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** :- वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिकेचे २ रुग्णालये, ३ माताबाल संगोपन केंद्रे तसेच विविध ठिकाणी २१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, क्षयरोग विभाग, ३ दवाखाने,कोव्हीड-१९ रुग्णालये कार्यरत आहेत. या सर्व रुग्णालयाचे/नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे व दवाखान्याचे कामकाज महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत पाहिले जाते. यानुसार महानगरपालिकेचे रुग्णालये, माताबाल संगोपन केंद्रे, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, दवाखाने,कोव्हीड -१९ रुग्णालये व वैद्यकीय आरोग्य विभागाच्या कामकाजासाठी विविध विषयांमधील तज्ञ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी व बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी पदे ही वेळोवेळी महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (३) या मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारा अंतर्गत तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेला अधिकारी/कर्मचारी वर्ग दरमहा मानधनावर नियुक्त करणेत आलेला आहे. सद्यस्थितीत महानगरपालिकेमार्फत खालील नमुद तक्त्यातील (प्रपत्र-१) तज्ञ वैद्यकीय अधिकारी, एम.बी.बी.एस.वैद्यकीय अधिकारी व बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.विविध विषयांचे तज्ञ वैद्यकीय अधिकारी एम.बी.बी.एस वैद्यकीय अधिकारी व बी.ए.एम.एस वैद्यकीय अधिकारी यांच्या वेतनापोटी दरमहा याकामी सोबत जोडलेल्या प्रपत्र क्र.१ मध्ये नमुद अंदाजे रु.५८,४१,१००/- इतका खर्च येत आहे.तसेच मा.आयुक्त यांनी तोंडी दिलेल्या आदेशान्वये प्रपत्र १ नुसार अदांजे रु.८१,९५,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षात "वैद्यकीय अधिकारी/वैद्यकीय सेवा व्यवस्थापन ठेका" या लेखाशिर्षाखाली रु.२९,००,००,०००/- इतकी तरतुद प्रस्तावित करण्यांत आलेली असून यामधून सदरचा खर्च भागविता येईल.सबब नमुद वैद्यकीय अधिकारी सर्व यांना मानधनात वाढ करणेस व याकामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीमिळणेकामी सदरचा विषय मान्यतेस्तव सादर.

ठराव :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची (ड) प्रकरण ५.२.२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार वैद्यकीय आरोग्य विभागामधील कार्यरत सर्व तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांना रु.८५,०००/- मासिक वेतन,एम.बी.बी.एस.सर्व वैद्यकीय अधिकारी रु.७५,०००/-मासिक वेतन,दंतचिकित्सक रु.५५,०००/- मासिक वेतन व बी.ए.एम.एस. सर्व वैद्यकीय अधिकारी रु.५०,०००/- मासिक वेतन (६ महिन्यांच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व ११ महिन्याच्या कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने सर्व वैद्यकिय अधिकारी महानगरपालिका व एन.यू.एच.एम मधील कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांना मासिक वेतन फरक महानगरपालिकेकडून अदा करणेस) येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

(गंगाथरन डी.) ८/३
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ५७८

**विभाग :-** घनकचरा व्यवस्थापन
**दिनांक :-** ०८/०३/२०२१

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनांतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी त्रैवार्षिक निविदेतील मंजूर निविदाकारांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता ६ महिन्याची प्रथम मुदतवाढ देणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** नागरी घनकचरा व्यवस्थापन हाताळणी अधिनियम २०१६ अन्वये महानगरपालिकांतर्गत असलेल्या प्रभाग समिती निहाय २० झोन साठी दैनदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे इत्यादी कामांसाठी इच्छुक संस्था कंत्राटदार अभिकर्त्याकडून सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या तीन वित्तीय वर्षाकरीता मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.२६ दि.२०/०२/२०१७ अन्वये तीन वर्षाकरीता ई-निविदा मागविण्यात मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार जा.क्र.व.वि.श.म/१८२/२०१७ दि.०२/०३/२०१७ रोजी जाहिर ई-निविदा वृत्तपत्रात प्रसिध्द करुन जाहिर ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या.

सदरील निविदेत आलेल्या दरास स्थायी समिती ठराव क्र.४४९ दि.१२/१२/२०१७ अन्वये घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत दैनंदिन रस्ते सफाई कचरा संकलन व क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या त्रैवार्षिक निविदेच्या प्रकियेअंतर्गत प्राप्त झालेल्या निविदाधारकांपैकी कमी दराच्या निविदाकारांच्या दरास मंजूरी देऊन करारनामा करुन कार्यादेश देण्यांस मंजूरी दिली आहे. त्यानुसार दि.३०/०१/२०२० अन्वये करारनामा करुन दि. २०/०२/२०१८ अन्वये कार्यादेश देण्यांत आला आहे.

तरी सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या त्रैवार्षिक वर्षाकरीता २० झोन मध्ये २० अभिर्कत्यांची नियुक्ती केली असून सदरचे काम १ वर्ष उशिरा सुरु झाल्याने दि.२८/०२/२०२१ पर्यंत वाढवून दिलेली आहे. त्यानुसार दैनंदिन रस्ते सफाई गटार सफाई कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणेकामी महानगरपालिकेकडून संबधीत अभिर्कत्यांना मासिक वेतन अदा करण्यांत आले येत आहे. परंतु सदरील नेमणूक केलेल्या अभिर्कत्यांची कामाची

मुदत ही मार्च २०२१ मध्ये संपत असल्याने प्रभाग समिती  निहाय निविदा मागवून नविन अभिकर्त्यांची २० झोनमध्ये नेमणूक करणे आवश्यक आहे. तसेच घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची अमंलबजावणी करणे आवश्यक असल्याने खालीलप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन विभागाने बनविलेल्या २० झोनमध्ये अभिकर्त्याची खालीलप्रमाणे मनुष्यबळ व त्यावर होणारा मासिक व वार्षिक खर्च होत आहे.

**मनुष्यबळावर होणारा मासिक व वार्षिक खर्च :-**

| झोन क्रमांक | रस्ते सफाई, कचरा संकलन व गटार सफाईसाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची संख्या | रस्ते सफाई, कचरा संकलन व गटार सफाईसाठी लागणाऱ्या मनुष्यबळावरील होणारा मासिक खर्च | रस्ते सफाई, कचरा संकलन व गटार सफाईसाठी लागणाऱ्या मनुष्यबळावरील होणारा वार्षिक खर्च |
|---|---|---|---|
| १ | ३१२ | ८६१९६३६.४८ | १०३४३५६३७.७६ |
| २ | २४६ | ६७९६२५१.८४ | ८१५५५०२२.०८ |
| ३ | ३०३ | ८३७०९९३.१२ | १००४५१९१७.४४ |
| ४ | ९४ | २४५८८०६.५६ | २९५०५६७८.७२ |
| ५ | २१८ | ५७४६४२४.३२ | ६८९५७०९१.८४ |
| ६ | १३७ | ३७८४९०४.४८ | ४५४१८८५३.७६ |
| ७ | ८६ | २३७५९२५.४४ | २८५११९०५.२८ |
| ८ | २०० | ५५२५४०८.०० | ६६३०४८९६.०० |
| ९ | २४० | ६६३०४८९.६० | ७९५६५८७५.२० |
| १० | १४० | ३८६७७८५.६० | ४६४१३४२७.२० |
| ११ | ९५ | २६२४५६८.८० | ३१४९४८२५.६० |
| १२ | १३९ | ३८४०१५८.५६ | ४६०८१९०२.७२ |
| १३ | १३८ | ३८१२५३१.५२ | ४५७५०३७८.२४ |
| १४ | ७८ | २१५४९०९.१२ | २५८५८९०९.४४ |
| १५ | ११७ | ३२३२३६३.६८ | ३८७८८३६४.१६ |
| १६ | ११० | ३०३८९७४.४० | ३६४६७६९२.८० |
| १७ | ३९२ | १०८२९७९९.६८ | १२९९५७५९६.१६ |
| १८ | १७२ | ४७५१८५०.८८ | ५७०२२२१०.५६ |
| १९ | ११४ | ३१४९४८२.५६ | ३७७९३७९०.७२ |
| २० | ८१ | २२३७७९०.२४ | २६८५३४८२.८८ |
| **एकुण** | **३,४१२** | ९३८४९०५४.८८ | ११२६१८८६५८.५६ |

तसेच महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ ची प्रभाविपणे अमंलबाजवणी करणेकामी सुका व ओलाकचरा विलगीकरण करणे आवश्यक असल्याने महानगरपालिकेने २४० लिटर क्षमतेच्या HDPE डस्टबीन्स खरेदी करण्यांत आल्या आहेत. सदरील डस्टबीन्स मधील जागीच विलगीकरण न होणारा सुका व ओला कचरा क्षेपणभुमीवर वाहतुक करणेकामी खालीलप्रमाणे २० झोन मध्ये कॉम्पॅक्टर, टिपर, डंपर, ट्रक्टर कार्यरत आहेत. सदर वाहन व त्यासाठी लागणाऱ्या इंधनावर खालील प्रमाणे मासिक खर्च होत आहे.

**वाहन व वाहनासाठी लागणारे इंधनावरील होणारा मासिक खर्च :-**

| झोन क्रमांक | कॉम्पॅक्टरची संख्या | कॉम्पॅक्टर वरील इंधनासह होणारा मासिक खर्च | टिपरची संख्या | टिपर वरील इंधनासह होणारा मासिक खर्च | डंपरची संख्या | डंपर वरील इंधनासह होणारा मासिक खर्च | ट्रक्टर संख्या | ट्रक्टर वरील इंधनासह होणारा मासिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७ | ११९०५४९.९२ | १३ | १०६४४१८.६ | ४ | ३५७२०३.८४ | २ | ५५०८१.६० |
| २ | ४ | ६९२३१४.५६ | ६ | ४९१२७०.०८ | १ | ८९३००.९६ | १ | २७५४०.९६ |
| ३ | ५ | ८५८३९३.७६ | ९ | ७३६९०५.१२ | ५ | ४४६५०४.८ | १ | २७५४०.८० |
| ४ | २ | ३६०१५७.२८ | ४ | ३२७५१३.७६ | ३ | २६७९०२.८८ | १ | २७५४०.८० |
| ५ | २ | ३६०१५७.२८ | ४ | ३२७५१३.७६ | २ | १७८६०१.९२ | ० | ०.०० |
| ६ | ३ | ५१९२३७.६० | ५ | ४०९३९३.६ | २ | १७८६०१.९२ | १ | २७५४०.८० |
| ७ | ३ | ५२६२३६.४८ | ५ | ४०९३९१.३६ | १ | ८९३०१.१८ | ० | ०.०० |
| ८ | ७ | ११९०५५१.०४ | १० | ८१८७८७.२ | २ | १७८६०१.९२ | ० | ०.०० |
| ९ | ३ | ५४०२३५.९२ | ९ | ७३६९०५.१२ | ६ | ५३५८०५.७६ | ० | ०.०० |
| १० | १ | १९४०७९.२० | २ | १६३७५६.३२ | २ | १७८६०१.९२ | १ | २७५४०.८० |
| ११ | ० | ०.०० | ३ | २४५६३६.१६ | ३ | २६७९०२.८८ | २ | ५५०८१.६० |
| १२ | १ | १९४०७९.२० | ४ | ३२७५१४.८८ | ४ | ३५७२०३.८४ | ३ | ८२६२२.४० |
| १३ | २ | ३८८१५८.४० | ४ | ३२७५१४.८८ | ३ | २६७९०२.८८ | २ | ५५०८१.६० |
| १४ | २ | ३६०१५७.२८ | २ | १६३७५६.३२ | २ | १७८६०२.३७ | १ | २७५४०.८० |
| १५ | २ | ३६०१५७.२८ | ४ | ३२७५१३.०९ | ६ | ५३५८०७.१ | १ | २७५४०.८० |
| १६ | २ | ३६०१५७.२८ | ४ | ३२७५१३.७६ | २ | १७८६०१.९२ | ० | ०.०० |
| १७ | ८ | १३५६६२९.१२ | १६ | १३१००५३.९ | ५ | ४४६५०५.९२ | १ | २७५४०.९२ |
| १८ | २ | ३८८१५८.०० | ५ | ४०९३९४ | ४ | ३५७२०४ | १ | २७५४१.०० |
| १९ | १ | १९४०७९.२० | ३ | २४५६३६.१६ | २ | १७८६०१.९२ | २ | ५५०८१.६० |
| २० | ० | ०.०० | २ | १६३७५७.४४ | ४ | ३५७२०३.८४ | ० | ०.०० |
| एकुण | ५७ | १००३३४८८.८० | ११४ | ९३३४१४५.५ | ६३ | ५६२५९६३.७७ | २० | ५५०८१६.४८ |

तसेच २० झोन मध्ये रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन इत्यादी कामासाठी येणाऱ्या कर्मच्याऱ्यांसाठी खालीलप्रमाणे हातगाडी व ट्रायसिकल उपलब्ध आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे मासिक खर्च होत आहे.

## हातगाडी व ट्रायसिकलवर होणारा मासिक खर्च

| झोन क्र. | हातगाडीची संख्या | हातगाडीवर होणारा मासिक खर्च | ट्रायसिकलची संख्या | ट्रायसिकलवर होणारा मासिक खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २३ | ३३२९.७६ | २३ | ११८४९.६० |
| २ | ७ | १०१३.६० | ७ | ३६०६.४० |
| ३ | १५ | २१७१.६८ | १६ | ८२४३.२० |
| ४ | ६ | ८६९.१२ | ७ | ३६०६.४० |
| ५ | ६ | ८६९.१२ | ७ | ३६०६.४० |
| ६ | ११ | १५९२.३६ | ११ | ५६६७.२० |
| ७ | ९ | १३०२.५६ | ५ | २५७६.०० |
| ८ | ३० | ४३४३.३६ | ३१ | १५९७१.२० |
| ९ | ५ | ७२३.८० | ५ | २५७६.०० |
| १० | ५ | ७२३.८० | ३ | १५४५.६० |
| ११ | ८ | ११५८.८० | ८ | ४१२१.६० |
| १२ | १० | १४४४.८० | १० | ५१५२.०० |
| १३ | १२ | १७३३.७६ | १४ | ७२१२.८० |
| १४ | १० | १४४७.६० | १० | ५१५२.०० |
| १५ | १० | १४४७.६० | १० | ५१५२.०० |
| १६ | १० | १४४७.६० | १० | ५१५२.०० |
| १७ | २० | २८९५.२० | २० | १०३०४.०० |
| १८ | ३ | ४३३.०० | ८ | ४१२२.०० |
| १९ | ३ | ४३३.४४ | ९ | ४६३६.८० |
| २० | ५ | ७२२.४० | ५ | २५७६.०० |
| एकुण | २०८ | ३०१०३.३६ | २१९ | ११२८२९.२ |

तसेच मनुष्यबळ, वाहने, साहित्य यासाठी एकुण रक्कम रु.११,९५,३६,४०२/- एवढा मासिक खर्च होत असून रक्कम रु.१,१९,५३,६४०/- एवढे १०% अभिकर्त्यांचा मासिक नफा असून एकूण रक्कम **रु.१३,१४,९०,०४२/-** एवढा मासिक खर्च होत आहे.

तरी सद्यस्थितीत काम करत असलेल्या अभिकर्त्यांची कामाची मुदत २८ फेब्रुवारी २०२१ रोजी संपत आहे. तरी सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता नव्याने

अभिकर्त्यांची नेमणूक करणे आवश्यक होते. तथापी संदर्भ क्र.५ अन्वये सादर करण्यात आलेली कार्यालयीन टिपणीवर मा.आयुक्त सो. यांनी त्रैवार्षिक निविदेकारांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षात जास्तीत जास्त ६ महिन्याकरिता अथवा नविन निविदा प्रक्रिया पुर्ण् होईपर्यंत मुदतवाढ देणेस लेखी आदेश दिले आहेत. तरी सदरीलकामी प्रति महा रक्कम रु.१३,१४,९०,४०२/- प्रमाणे ६ महिन्यांकरिता रक्कम रु.७८,८९,४०,२५२/- एवढा खर्च होणार असून एवढया खर्चास माहे १ मार्च २०२१ ते ३१ ऑगस्ट २०२१ पर्यंत जास्तीत जास्त ६ महिन्यांकरिता किंवा नविन निविदा प्रक्रिया होऊन नविन अभिकर्ता नियुक्ती होईपर्यंत सद्याच्या निविदेतील व करारनाम्यातील सर्व प्रशासकीय व वित्तीय अटी व शर्तीस अधिन राहून नविन करारनामा करुन घेऊन मुदतवाढ देणे व कार्यादेश देणेकामी सदरचा प्रस्ताव सादर.

**ठराव निर्णय :-**

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनांतर्गत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई, कचरा संकलन करुन क्षेपणभुमीवर वाहतुक करणे या कामासाठी त्रैवार्षिक निविदेतील मंजूर निविदाकारांना सन २०२१-२२ या वित्तीय वर्षाकरिता ६ महिन्यासाठी किंवा नविन निविदा प्रक्रिया होऊन नविन अभिकर्त्यांच्या नियुक्त्या होईपर्यंत प्रथम मुदतवाढ देऊन सदरील कामी प्रती महा रक्कम रु.१३,१४,९०,४०२/- प्रमाणे ६ महिन्यांकरिता रक्कम रु.७८,८९,४०,२५२/- एवढया खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

26/2/2021

**(गंगाथरन डी.)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई - विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पूर्व), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी -२०२०-२५२५१०१/०२/०३/०४ ०५/०६, फॅक्स् -०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ५७८

विभाग : बांधकाम विभाग
दिनांक :०८/०३/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विरार (पू.) प्रभाग समिती 'सी'मधील वॉर्ड क्र.२२ येथील विकास कामांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभाग समिती 'सी' फुलपाडा येथे मोठया प्रमाणावर लोकवस्ती आहे. सदर फुलपाडा परिसरात विकास नगर व प्रथमेश नगर येथील रस्त्यांची मोठया प्रमाणावर दुरावस्था झालेली आहे. सदर रस्ता दुचाकी वाहनांच्या रहदारीस धोकादायक झाला असून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब उपरोक्त रस्ते तातडीने डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पुढील नमुद रस्त्यांची सुधारणा करणेची मागणी वांरवार तेथिल रहिवाशी यांच्याकडून करणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंतभूर्त बाब | अंदाजपत्रकीय रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील वॉर्ड क्र.२२ मधील बारोंडा देवी अपार्टमेंट ते मंगलम अपार्टमेंट पर्यंत रस्त्याची सुधारणा करणे. | १. DBM (Dense Bituminous Macadam)= ४८m x५m<br>२. BC (Bituminous concrete) = ४८m x ५m | २,९६,९५३/- |
| २ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील वॉर्ड क्र.२२ मधील मंगलम अपार्टमेंट ते डोंगरी पर्यंत रस्त्याची सुधारणा करणे. | १. DBM (Dense Bituminous Macadam)= ४८m x५m<br>२. BC (Bituminous concrete) =४८ m x५m | २,९६,९५३/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती सी मधील वॉर्ड क्र.२२ मधील जि.प.शाळा ते विजयी लक्ष्मी कलेक्शन फुलपाडा येथील रस्त्याची सुधारणा करणे. | १. DBM (Dense Bituminous Macadam)= ३७m x६.५०m<br>२. BC (Bituminous concrete) =३७ m x ६.५०m | २,९९,९८४/- |

**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील विरार (पू)फुलपाडा येथे उपरोक्त नमूद कामांची आवश्यकता लक्षात घेता उपरोक्त नमूद विविध कामांसाठी चालू दरसूची सन १९-२० नुसार तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास तसेच दरसूचीमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबींकरीता मान्यताप्राप्त दरपत्रकानुसार होणाऱ्या अनुषगीक खर्चासमा.आयुक्त सो. हयांचे कडील दि. १८/०९/२०२० रोजीच्या जा.क्र.व.वि.श.म/६५२/२० आदेशान्वये मला प्राप्त अधिकारानुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

8/3/21

उप आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका

# वसई -विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी -०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स -०२५०-२५२५१०७,
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

---

मुख्यप्रशासकीय ठराव क्र. ५८०

विभाग : बांधकाम
दिनांक : ०८/०३/२०२१

---

**मुख्य प्रस्तावाचा विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात ODF++ साठी प्रभाग समिती 'F' मधील १५ स्वच्छता गृहाची दुरुस्ती करणे.

**मुख्य प्रस्तावाचा मजकूर :-** अंदाजपत्रकीय रक्कम :- २०,३९,६७०/-

मा. सर्वसाधारण सभा ठराव क्र. :- १८५ दि. २८/१०/२०२०

ई-टेण्डरींग व्दारे निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/४९१/२०२० दि. २८/१०/२०२०
कार्यकारी अभियंता तथा शहर अभियंता,
वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिध्दी दिनांक :- दि. २९/१०/२०२०

वृत्तपत्रातील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै. लोकमत, दै. वृत्तमानस, दै. आमची मुंबई, दै. इकोनॉमीक टाईम्स, दै. इन्डीयन एक्सप्रेस, दै.नवभारत, दै. हमारा महानगर

ई-टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख (प्रिपरेशन व स्विकारण्याची) तारीख :- दि. २९/१०/२०२० दु. ३.०० पासुन ते दि.१२/११/२०२० दु. ३.०० पर्यत

विहीत मुदतीत ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे प्राप्त निविदा :- ५

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (प्रथम लखोटा) :- दि.१७/११/२०२० दु. ३.०१ वाजता

ई-टेण्डरींग व्दारे निविदा उघडण्याची दिनांक (व्दितीय लखोटा) :-दि. २४/११/२०२० दु. ३.०१ वाजता

प्राप्त निविदा उघडणारे अधिकारी :- १) कार्यकारी अभियंता तथा शहर अभियंता

विहीत मुदतीत खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाल्या असून लखोटा क्र. १ मध्ये मागणी प्रमाणे उपलब्ध कागदपत्रे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | निविदा धारकांचे नाव | निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा | निविदेच्या दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असल्यास परफॉर्मन्स सिक्यूरिटी बाबत धनाकर्ष तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | मे.रिषभ एंटरप्रायजेस | ०.०० % | | |
| २ | मे. शिक्षा असोसीएट्स | ३.९८% | | |
| ३ | मे. ध्रुव कंन्स्ट्रक्शन | ४.५५ % | | |

**निर्णय :-** सदर विषयाबाबत निविदा सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर कामी पाच निविदा प्राप्त झालेल्या आहेत. ५ पैकी ३ निविदाधारकांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्राप्त ५ पैकी ३ निविदा पात्र असल्याने निविदा समितीने लघुत्तम दराचे निविदा धारक मे.रिषभ एंटरप्रायजेस ह्यांच्या ०.०० % कमी दराची निविदा मंजूरीस मान्यता दिलेली आहे. सदर कमी दराच्या निविदा दरास मान्यता देत असून महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे तसेच त्याअनूषंगाने येणाऱ्या इतर अनुषांगिक खर्चास मान्यता देत आहे.

प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जिल्हा - पालघर पिन नं. ४०१ ३०५
दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. - ५८१

विभाग - पाणीपुरवठा
दिनांक - ०८/०३/२०२१

**प्रस्तवाचा विषय -** प्रभाग समिती (बी) हद्दीतील तुळींज दत्त मंदिर इच्छापुर्ती सोसायटी समोर सुर्या योजनेच्या मुख्य जलवाहिनीवरील ४०० मी.मी. व्यासाच्या व ३५० मी.मी. व्यासाच्या व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे व इतर किरकोळ कामे करणे.

**प्रस्तवाचा मजकूर -** वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (बी) हद्दीतील मोरेगांव येथील अमृत योजने अंतर्गत जलकुंभा बांधकाम करण्यात आले आहे. महानगरपालिका मार्फत सदर जलकुंभात पाणी भरून टेस्टींग काम सुरू आहे. सदर जलकुंभातुन लवकरच लगतच्या परिसरात मनवेलपाडा, कारगील नगर, तुळींज विभाग पाणीपुरवठा सुरू करण्यात येणार आहे. सद्यस्थीतीत जलकुंभात पाणी भरणे कामी सुर्या योजनेच्या नविन जलवाहिनीस तुळींज दत्त मंदिर इच्छापुर्ती सोसायटी समोर ३५० मी.मी. व ४०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी अंतर्गत जोडणी करण्यात आली आहे. सदर जोडणीच्या ठिकाणी असलेल्या ३५० मी.मी. व ४०० मी.मी. व्यासाचे स्लुस व्हॉल रस्त्याच्या मध्ये असल्याने पाणीपुरवठा सुरू बंद करताना व भविष्यात व्हॉल नादुरूस्त झाल्यास दुरूस्तीस अडचण येऊ शकते याकामी ४०० मी.मी. व्यासाच्या व ३५० मी.मी. व्यासाच्या व्हॉलकरीता आर.सी.सी. चेंबर बांधकाम करणे, एम.एस. कव्हर बसविणे व इतर किरकोळ कामे करणे आवश्यकता आहे. पाणीपुरवठा अत्याआश्यक बाब असल्याने सदर काम करावे लागणार आहे. याकामी निविदा मागवून काम करावे लागणार आहे. कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
